# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/078/2021-2023

YEAR : 48) 1st April 2023 ( No. of Pages 16 ) ( No : 05

# विद्यापीठांच्या कुलगुरु पदावरील कलंक कुलगुरु नामे डॉ. प्रमोद येवले

- प्रा.बी.टी.देशमुख

*माजी विधान परिषद सदस्य व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

**१.** "आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष **लोकशाही गणराज्य** घडविण्याचा" आमच्या या घटना समितीत संकल्पपूर्वक निर्धार करीत आहोत अशी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेची सुरुवातच उपरोक्त वाक्याने आहे. एकदा लोकशाही गणराज्याची कल्पना स्वीकारली की, निवडणुकीची प्रक्रिया ही एक अपरिहार्य बाब ठरते. निवडणुका ह्या मुक्त (Free) व निःपक्षपाती (Fair) वातावरणात पार पडाव्यात हा त्या प्रक्रियेचा गाभा असतो. एकदा निवडणूक सुरू झाली की, त्या निवडणुकीला मध्ये कोणत्याही प्रकारचे आव्हान देता येणार नाही. ती निवडणूक पार पडल्यानंतरच निवडणूक याचिका दाखल करून असे आव्हान देता येऊ शकेल अशी स्पष्ट तरतूद भारतीय संविधानाच्या कलम ३२९ (ब) मध्ये नमूद आहे. ती पुढील शब्दात.:-

"(b) no election to either House of Parliament or to the House or either House of the Legislature of a State shall be called in question except by an election petition presented to such authority and in such manner as may be provided for by or under any law made by the appropriate Legislature."

**२.** घटनेतील उपरोक्त तरतूद संसदेच्या व राज्य विधानमंडळाच्या सभागृहातील सदस्यांच्या निवडणुकांबाबत असली तरी मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अनेक निर्णयांनी अशा प्रकारची व्यवस्था ही सर्वच निवडणुकांकरिता देशभर एक समान व्यवस्था म्हणून अस्तित्वात आलेली आहे व तशा प्रकारची तरतूद निरनिराळ्या कायद्यात व नियमातसुद्धा अंतर्भूत आहे. खुद्द विद्यापीठांच्या परिनियमात सुद्धा सिनेटच्या बैठकीत निवडणूक होत असल्यामुळे निवडणुकी साठीची सभा एकदा बोलाविण्यात आली की, ती सभा रद्द करण्याचा, प्रलंबित करण्याचा अधिकार कुलपतींना, कुलगुरुंना किंवा कोणत्याही अधिकाऱ्याला देण्यात आलेला नाही.

**३.** घटनेच्या या कलम 329 (b) मध्ये सांगितलेली व्यवस्था एकूण सर्व स्तरावरील निवडणुकांना लागू करणारे निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणात दिलेले आहेत. निवडणुकीचे नोटिफिकेशन निघाल्याच्या दिनांकापासून तर निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याच्या दिनांकापर्यंत करण्यात आलेल्या सर्व क्रिया प्रक्रिया 'निवडणूक' या संज्ञेमध्ये समाविष्ट असतात असे या निर्णयात नमूद आहे. त्या अनेक निर्णयांचा आढावा घेऊन याबाबतीत Election Commission of India Versus Ashok Kumar या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबत कायद्याचा अंतिम शब्द निश्चित करून दिलेला आहे. त्यातील महत्त्वाचा भाग शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"(1) If an election, **(the term election being widely interpreted so as to include all steps and entire proceedings commencing from the date of notification of election till the date of declaration of result)** is to be called in question and which questioning may have the effect of interrupting, obstructing or protracting the election proceedings in any manner, the invoking of judicial remedy has to be postponed till after the completing of proceedings in elections.

(2) Any decision sought and rendered will not amount to "calling in question an election" if it subserves the progress of the election and facilitates the completion of the election. Anything done towards completing or in furtherance of the election proceedings cannot be described as questioning the election." ***(58 (2000) 8 SCC 216)***

**३.१** देशभर निवडणुकांचे नियंत्रण करणारी उपरोक्त आधारभूत व्यवस्था म्हणजे सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेला कायद्याचा या देशातील याबाबतचा अंतिम शब्द आहे. त्याचा गोषवारा थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येईल. निवडणूक प्रक्रियेमध्ये निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाल्याच्या तारखेपासून तर निकाल जाहीर होण्याच्या तारखेपर्यंतच्या सर्व क्रिया प्रक्रिया समाविष्ट असलेल्या कार्यवाहीचा समावेश होतो. अशा या निवडणूक प्रक्रियेला कोणी आव्हान देत असेल व त्या आव्हानामुळे निवडणुकीची प्रक्रिया लांबविली जाणार असेल, थांबविली जाणार असेल, अवरुद्ध होणार असेल, तर न्यायालयांनी अशा याचिकांवरील निर्णय निवडणुकीचा निकाल लागेतोवर पुढे ढकलला पाहिजे. न्यायालयाच्या अशा निर्णयामुळे निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्यास मदत होणार असेल तर गोष्ट वेगळी, त्याला निवडणुकीला आव्हान देण्यात आले आहे असे म्हणता येणार नाही."

**४.** निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये बाधा उत्पन्न करणाऱ्या कोणत्याही प्रयत्नांपासून न्यायालयांनी सावध राहीले पाहिजे असा दंडकच मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या न्यायव्यवस्थेसाठी घालून दिलेला आहे तो पुढील शब्दात :- "Court must guard against any attempt at retarding, interrupting, protracting or stalling of the election proceedings. Care has to be taken to see that there is no attempt to utilise the court's indulgence by filing a petition outwardly innocuous but essentially a subterfuge or pretext for achieving an ulterior or hidden end. Needless to say that in the very nature of the things the court would act with reluctance and shall not act," ***((2000) 8 SCC 216)***

**"The propensity for the electoral process to be afflicted with the vice of wholly unfair means being overlooked by those who are the guardians of the rights of the citizenry as declared by this Court would spell disastrous consequences.** *( Supreme Court Judgment : See Para 5.1 )*

**"The means to gain power in a democracy must remain wholly pure and abide by the Constitution and the laws. An unrelenting abuse of the electoral process over a period of time is the surest way to the grave of the democracy."** *( Supreme Court Judgment : See Para 5 )*

**५.** मा.सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निर्णयामध्ये (Anoop Baranwal Versus Union of India, Writ Petition (Civil) No.104 of 2015) आणखी काही ठाम निष्कर्ष नमूद केलेले आहेत. लोकशाही व्यवस्थेच्या माध्यमातून सत्ता मिळविण्याचा हा मार्ग वापरत असतांना तो घटना व कायद्याने घालून दिलेल्या मर्यादा यांचे पालन करूनच वापरल्या गेला पाहिजे. निवडणूक प्रक्रियेची मोडतोड करून सत्ता मिळविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे लोकशाहीची कबर खोदणे होय असा हा निष्कर्ष आहे. शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"The means to gain power in a democracy must remain wholly pure and abide by the Constitution and the laws. An unrelenting abuse of the electoral process over a period of time is the surest way to the grave of the democracy." *(Para 164)*

**५.१** निवडणुकांचे संचालन करण्याचा अधिकार ज्यांना देण्यात आलेला आहे त्यांनी निवडणूक प्रक्रियेचा गैरवापर करणे किंवा होत असलेल्या अशा गैरवापराकडे दुर्लक्ष करणे हे फार घातक असू शकते असेही मा.सर्वोच्च न्यायालयाने याच निर्णयात नमूद केलेले आहे ते पुढील शब्दात :-

"The propensity for the electoral process to be afflicted with the vice of wholly unfair means being overlooked by those who are the guardians of the rights of the citizenry as declared by this Court would spell disastrous consequences. *(Para 164)*

**५.२** राज्यात किंवा राज्याच्या काही भागात दंगेधोपे, अशांतता यामुळे परिस्थिती बिघडली (disturbed conditions) असेल तरच भारतीय संविधानाच्या खंड ३२४ अन्वये गठीत झालेल्या देशाच्या निवडणूक आयोगालासुद्धा अशा अत्यंत अपवादभूत परिस्थितीमध्येच निवडणूक तहकूब करण्याचा अधिकार असेल असा मा.सर्वोच्च न्यायालयाने दंडक घालून दिलेला आहे तो पुढील शब्दातः-

*सहपत्र : १ (परिच्छेद ११ पहा)*

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

जा.क्र. संगाबाअवि/१/१२१/ए-९६/२०२३

**दिनांक : २०.१.२०२३**

प्रति,
सर्व सन्माननीय सदस्य, अधिसभा,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय** : विशेष अधिसभा ... दिनांक १० फेब्रुवारी २०२३ निवडणूक/सभा सूचना

महोदय/महोदया,

मा.कुलपतींनी दिलेल्या अनुमतीनुपंगाने आपणांस सन्मानपूर्वक कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(४) आणि महाराष्ट्र शासनाच्या एकरूप परिनियम क्र. १/२०१७ च्या ९(२) आणि एकरूप परिनियम क्र. ४/२०१९ च्या ३(१) या तरतुदी अंतर्गत, अधिसभा सदस्यांमधून विविध प्राधिकरणांवर निवड तथा नामनिर्देशन करण्यास्तव अधिसभेची विशेष सभा, **शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता अधिसभा सभागृह**, मुख्य प्रशासकिय इमारत, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ परिसर येथे आयोजित करण्यात आली आहे.

सबब आपणांस विनंती की, सदर्हू विशेष सभेला आपण उपर्निर्दिष्ट स्थळी, दिनांक व वेळेवर उपस्थित रहावे.

निवडणुकीचा कार्यक्रम सोबत जोडलेल्या विषयसूचीप्रमाणे राहील.

आपला विश्वासू,

**(डॉ.तुषार देशमुख)**
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

सर्व प्रशासकीय अधिकारी/शैक्षणिक विभाग प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना माहितीस्तव

"The Election Commission under Article 324 can postpone an election on the basis of the opinion that there existed disturbed conditions in the State or some area of the State thus making of holding free and fair elections not possible." *(Para 151)*

**६.** निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्याच्या दिनांकापासून तर निकाल जाहीर होण्याच्या दिनांकापर्यंतच्या काळात निवडणुकीच्या प्रक्रियेमध्ये कुणीही हस्तक्षेप करू नये, असा दंडक देशाच्या मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेला आहे. हा दंडक न्यायव्यवस्थेवर सुद्धा बंधनकारक आहे. अशा स्थितीत अमरावती विद्यापीठाच्या सिनेटला ज्या परिस्थितीला सामोरे जावे लागले ती स्थिती पाहता एका प्रसिद्ध आंग्लकवीच्या "For fools rush in where angels fear to tread" या ओळीची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. या ओळीचा वापर या प्रकरणी करणे योग्य नसले तरी जिथे देवदूत सुद्धा प्रवेश करायला घाबरतात तिथे भुते बिनदिक्कतपणे प्रवेश करतात, अशा प्रकारचे एक भूत प्रभारी

*सहपत्र : २ (परिच्छेद १९ पहा)*

**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY**
Amravati - 444602 (M.S.)
Phone No : 2662206, 2662207, 2662208, 2662249, 2662358
Fax No. : 0721-2660949, 2662135
Gram : AMUN Website : www.sgbau.ac.in
No. SGBAU/1/121/A-143/2023
**Date : 4th February 2023**

To,
Shri Santosh Kumar,
Secretary to Hon'ble Chancellor,
Raj Bhavan, Malbar Hills, Mumbai-35

**Subject :** Special meeting of Senate scheduled on 10.2.2023

**Reference : (1)** This office letter No. SGBAU/1/121/A-76/2023, dt. 17.1.2023 **(2)** Your good office letter No. RB/SGBAU-2023/CR-351/Edn.1/89, dt. 19.1.2023 **(3)** Various representations for cancellation of meeting.

Respected Sir,

A request letter was sent to your good office vide reference-1 above, for conduction of a special meeting of Senate for Elections/ Nominations on Management Council, Academic Council and other Committees of the University. Upon this, permission of Hon'ble Chancellor has been received from your office vide letter referred at No. 2 above.

In this respect, it is to inform you that **various representations** have been received through e-mails from some members of Senate, **for cancellation of the said meeting to the University and your office also. In the light of points raised through representations, it is my duty to elaborate the factual information in this regard. A petition filed by some members of Senate before High Court for cancelling the said meeting.**

**Nominations from the Hon'ble Chancellor on the Senate are yet to receive and Senate is not fully constituted.** Hence, in the light of above facts, you are requested **to take orders of the Hon'ble Chancellor that the scheduled meeting may be postponed.**

Thanking you in anticipation,

Yours Sincerely,
**(Dr.Pramod Yeole)**
Vice-Chancellor

**"Court must guard against any attempt at retarding, interrupting, protracting or stalling of the election proceedings. Care has to be taken to see that there is no attempt to utilise the court's indulgence by filing a petition outwardly innocuous but essentially a subterfuge or pretext for achieving an ulterior or hidden end. Needless to say that in the very nature of the things the court would act with reluctance and shall not act,"**

*( Supreme Court Judgment : See Para 4 )*

कुलगुरुंच्या रूपाने अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरू दालनात घुसले असे निश्चितपणे म्हणता येईल. ज्या प्रकरणी उच्च न्यायालयानेसुद्धा स्थगनादेश देऊ नये असा सर्वोच्च न्यायालयाचा दंडक आहे तेथे सिनेटची बैठक प्रलंबित करण्याची प्रक्रिया सुरू करून स्थगित करण्याच्या कुप्रसिद्ध कारस्थानामध्ये यशस्वी झालेल्या कलंकित प्रभारी कुलगुरुंच्या कपटी कारवायांचे तपशील पुढील परिच्छेदातून नमूद करण्यात येत आहेत.

**७.** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या प्राधिकरणांचा पाच वर्षांचा कार्यकाळ सप्टेंबर-ऑक्टोबर २०२२ मध्ये संपला. सन २०१६ च्या विद्यापीठ कायद्याच्या *(यापुढे उल्लेख 'विद्यापीठ कायदा' असा)* कलम ६२ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

**"62.** (1) The term of every authority constituted under this Act shall commence on 1st September and shall be of five years from the said date and the term of the members of every authority shall expire on the expiry of the said period of five years, irrespective of the date on which a member has entered upon his office.

(2) The process of election, nomination and co-option shall be commenced at least three months before expiry of the term of the authority and shall be completed not later than 30th November in that year."

**८.** उपरोक्त तरतुदीप्रमाणे विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे तत्कालीन मा.कुलगुरुंनी/प्रभारी कुलगुरुंनी सिनेट व इतर प्राधिकरणांच्या निवडणुकांचे आयोजन केले व दिनांक २० नोव्हेंबर २०२२ रोजी ह्या निवडणुका पार पडल्या. निवडणूक पार पडल्यानंतर तत्कालीन मा.कुलगुरुंनी/प्रभारी कुलगुरुंनी कार्यकारी मंडळाची रचना करण्यासाठी सिनेट बैठकीची तयारी सुरू केली. महाराष्ट्राचे मा.राज्यपाल हे कुलपती या नात्याने सिनेटचे पदसिद्ध अध्यक्ष असतात आणि त्यामुळे सिनेट बैठकीची तारीख ही त्यांच्या पूर्व संमतीनेच निश्चित करावी लागते. विद्यापीठ कायद्याच्या कलम २८

*सहपत्र : ३ (परिच्छेद २१.२ पहा)*

Sant Gadge Baba Amravati University Gazette - 2023 - Part Two– 24

**NOTIFICATION**

**No. : 15/2023 Date : 21.01.2023**

**Subject :** Re-constitution of Senate.

It is notified for general information of all concerned that, the Hon'ble Vice-Chancellor has declared that the Senate is re-constituted as per provision of section 28(2) of the Maharashtra Public Universities Act, 2016.

The term of the authority will be from 1st September, 2022 to 31st August, 2027 as per provisions of section 62(1) of the Act.

Sd/-
(Dr.Tushar R. Deshmukh)
Registrar Sant Gadge Baba Amravati University

*****

(४) मध्ये याबाबत पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

"(4) The Senate shall meet at least twice a year on the date to be fixed by the Chancellor. One of the meetings shall be the annual meeting."

**९.** निवडणुकीसाठी सिनेट बैठक बोलवावयाची तर निदान स्पष्ट २० दिवस अगोदर सूचना द्यावी लागेल अशा प्रकारची तरतूद एकरूप (सन २०१७ चा क्रमांक १) परिनियमाच्या परिच्छेद ९ (२) मध्ये आहे. ती पुढीलप्रमाणे :-

"(2) In the case where an election is to be held at a meeting of an authority or body, the notice of election shall be issued at least **twenty clear days** before the date of the meeting."

**१०.** कायद्यातील व परिनियमातील उपरोक्त तरतुदी लक्षात घेवून विद्यापीठाच्या कुलसचिवांनी मा.कुलगुरुंच्या संमतीने सिनेट बैठकीसाठी १० फेब्रुवारी २०२३ ही तारीख निश्चित केली. दिनांक १७ जानेवारी २०२३ रोजी एक पत्र (No. SGBAU/1/121/A-76/2023) पाठवून त्या तारखेला संमती द्यावी अशी मा.कुलपतींना विनंती केली. मा.कुलपतींच्या कार्यालयाने ताबडतोबच म्हणजे दोनच दिवसात दिनांक १९ जानेवारी २०२३ रोजी अमरावती विद्यापीठाला पत्र (No. RB/SGBAU-2023/CR-351/Edn.1/89) पाठवून १० फेब्रुवारी २०२३ या तारखेला सिनेटची बैठक घेण्यास मा.कुलपतींची संमती असल्याचे कळविले.

**११.** एकदा मा.कुलपतींची मान्यता मिळाल्यानंतर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी सिनेटच्या बैठकीची सूचना (जा.क्र. संगाबाअवि/१/१२१/ए-९६/२०२३) निर्गमित केली. या सुचनेमध्ये कुलपतींनी या तारेखला मान्यता दिलेली आहे असे स्पष्टपणे नमूद असून निवडणुकसाठीची ही विशेष सभा शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आलेली आहे असे या नोटीसमध्ये नमूद आहे. सदरहू नोटीस **सहपत्र : १** म्हणून सोबत प्रसृत केलेली आहे.

**१२.** या नोटीस सोबत सिनेट बैठकीची कामकाज पत्रिकासुद्धा जोडण्यात आलेली असून परिनियमातील तरतुदीप्रमाणे निवडणुकीचे वेळापत्रकसुद्धा सोबत प्रसृत करण्यात आलेले आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"एकरूप परिनियम क्र. १/२०१७ या तरतुदीअंतर्गत मा.कुलगुरुंनी मान्य केलेले निवडणूक वेळापत्रक/माहितीपत्रक (Schedule of Election) खालीलप्रमाणे:-

**(अ)** नामांकन पत्र स्वीकारण्याचा अंतिम दिनांक (विद्यापीठ सामान्य प्रशासन विभाग) : सोमवार, दिनांक ३०.०१.२०२३ सायंकाळी ५.०० वा. पर्यंत

**(ब)** नामांकन पत्राची छाननी (स्थळ : अधिसभा सभागृह) : मंगळवार, दि. ३१.१.२०२३ दुपारी १२.०० वा. पासून

**(क)** वैध उमेदवारांच्या नावाच्या यादीस प्रसिद्धी : मंगळवार, दि. ३१.१.२०२३ (छाननीनंतर)

**(ड)** मा.कुलगुरुंकडे अपील : बुधवार, दि. १.२.२०२३ दुपारी ४.०० वाजेपर्यंत

**(इ)** उमेदवारी मागे घेण्याचा दिनांक : शनिवार, दि. ४.२.२०२३ दुपारी ५.०० वाजेपर्यंत

**"If an election, (the term election being widely interpreted so as to include all steps and entire proceedings commencing from the date of notification of election till the date of declaration of result) is to be called in question and which questioning may have the effect of interrupting, obstructing or protracting the election proceedings in any manner, the invoking of judicial remedy has to be postponed till after the completing of proceedings in elections.**

*( Supreme Court Judgment : See Para 3 )*

**(ई)** उमेदवारांच्या नावाच्या अंतिम यादीस प्रसिद्धी : शनिवार, दि. ४.२.२०२३ (दुपारी ५.०० वाजेपर्यंत)

**(फ)** मतदानाचा दिवस (आवश्यकता भासल्यास) : शुक्रवार, दि. १०.२.२०२३ (मतदानाची वेळ सभागृहात निश्चित केल्या जाईल.)

**(प)** मतमोजणी व निकाल जाहीर करणे : शुक्रवार, दि. १०.२.२०२३ (मतदानानंतर लगेचच)"

**१३.** विद्यापीठाच्या कुलसचिवांनी दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी सिनेटची विशेष सभा निवडणुकांच्या प्रयोजनार्थ बोलाविण्यात आली असल्याची नोटीस काढल्यानंतर पुढच्या १०-१२ दिवसांत घडलेल्या एक महत्त्वाच्या घटनाक्रमाचा या ठिकाणी उल्लेख करणे आवश्यक वाटते. सिनेटच्या दोन-तीन सदस्यांनी सिनेटवरील राज्यपालांनी कुलपती या नात्याने नेमावयाचे व कुलगुरुंनी नेमावयाचे सदस्य यांची नेमणूक झाल्याशिवाय सिनेटची अशी सभा बोलावू नये अशा प्रकारची विनंती विद्यापीठाला केली. विद्यापीठ त्यावर काही कारवाई करीत नाही असे पाहून त्याच सदस्यांनी मा.कुलपतींकडे सुद्धा याबाबतचे निवेदन सादर केले. मात्र कुलपतींच्या कार्यालयाकडून सुद्धा त्यावर काहीही कारवाई झाली नाही. तक्रारकर्त्या या सदस्यांचे काय म्हणणे होते हे लक्षात यावे म्हणून दिनांक २५ जानेवारी २०२३ रोजी विद्यापीठाला सादर केलेल्या त्यांच्या निवेदनातील मागणी मी शब्दशः नमूद करीत आहे ती पुढीलप्रमाणे :- "सदर अधिसभा सदस्यांमधून विविध प्राधिकरणावर निवड तथा नामनिर्देशन करण्यास्तव अधिसभेची विशेष सभा मा.राज्यपाल नामित तथा मा.कुलगुरू नामित सदस्यांची यादी प्रकाशित झाल्यावर घेण्यात यावी." निवडणुकीसाठी सिनेटची सभा केंव्हा बोलवावी याबाबत कायद्यात किंवा परिनियमात नसलेला एक नवीन नियमच या सदस्यांनी सुचविला होता.

**१४.** विद्यापीठाच्या कुलगुरुंची, कुलसचिवांची किंवा कुलपतींची काही चूक झालेली आहे असे वाटत असेल तर त्या विरोधात तक्रार करण्याचा सामान्य नागरिकाला सुद्धा अधिकार असतो. सिनेटच्या सदस्यांना तर तो असतोच असतो. अशा तक्रारीमुळे प्रशासनाला आपली खरोखरच काही चूक झालेली आहे काय? हे तपासून पाहण्याची संधी मिळते. वस्तुतः याबाबतीत कायद्याची स्थिती अतिशय स्पष्ट आहे. विद्यापीठ कायद्याच्या १४३ या कलमाचे हेडिंगच मुळात पुढीलप्रमाणे आहे.:- **"Acts and proceedings not invalid merely on ground of defect in constitution, vacancies, irregularity in procedure, etc."** १४३ कलमातील ही तरतूद अशी की, कोणत्याही प्राधिकरणांवर एक किंवा काही सदस्य नेमल्या गेले नसतील, निवडल्या गेले नसतील तर त्यामुळे त्या कारणावरून त्या प्राधिकरणाचे काम कोणत्याही अर्थाने बाधित होणार नाही. विद्यापीठ कायद्याच्या १४३ कलमातील ही तरतूद शब्दशः पुढीलप्रमाणे:-

**"143.** No act or proceeding of the Senate or the Management Council or the Academic Council or any other authority or any

*सहपत्र : ४ (परिच्छेद ३१ पहा)*

To,
The Hon'ble Vice-Chancellor,
Sant Gadge Baba Amravati University, Amravati.

**Sub:** Special Meeting of Senate Scheduled on 10.02.2023.

**Ref: (i)** Order of the Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court Dt:06.02.2023 in W.P. No. 847/2023. **(ii)** Your Office Letter Dt: 19.01.2023.

**Applicants: (1)** Dr. Ravindra NarayanraoMundre.
**(2)** Dr. Subhash Pralahadrao Gawande.

Respected Sir,

**1.** That some of the candidates who are senate members have approached before the Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court by filing Writ Petition No.847/2023 and challenged the final stage of election i.e. meeting of election/nomination which is scheduled on 10.02.2023 and prayed for the postponement of the meeting. **That the SGB Amravati University was party to the petition as respondent no.2 and duly represented through your panel advocate.**

**2.** That the applicants are the Senate Members of the Sant Gadge Baba Amravati University, Amravati elected in the Election conducted on 20.11.2022. The applicant no.1 represents SC Category and applicant no.2 represents OBC category elected under Ten Teachers as per Section 28(2)(r) of the Maharashtra Public University's Act, 2016.Therefore, they have submitted application CAW No. 389/2023 for intervention in the above said petition which came to be allowed by the Hon'ble High Court.

**3. That after hearing the parties in detailed, the Hon'ble High Court on 06.02.2023 has refused to postpone or cancel the meeting scheduled on 10.02.2023.** That during the hearing the Hon'ble Court has observed that election has been commenced after the due permission granted by the Hon'ble Chancellor and now only the last stage of meeting is left. **The Hon'ble Court further observed that there is no rule/provision/statute which permits anyone to postpone the election and finally the petition has been disposed of as withdrawn.**

**4.** That in view of the above order of the Hon'ble Court, it is clear that the meeting of election/nomination cannot be cancel or postponed for any reason **and no provision of law is available in that respect. Therefore, any act in contravention to this will be contemptuous of the Hon'ble High Court.** Hence by this application it is humbly requested from your good office that no order or direction in respect of cancellation or postponement of election may be passed without giving notice and hearing to the applicants, otherwise it will be a contemptuous act and of violative of principles of Natural Justice as per Art 14 of the Constitution of India.

Hence this application for information and to take note.

Amravati                Date: 06.02.2023

sd/-

**(1) Dr. Ravindra NarayanraoMundre**
**(2) Dr. Subhash Pralahadrao Gawande**

**Encl: (1)** Memo of Petition (WP No.847/2023) **(2)** Order Dt:06.02.2023 **(3)** Notification of meeting of election dt. 20.01.2023 **(4)** List of contesting candidates.

body or committee of the university, including a committee appointed by the Chancellor for the appointment of a Vice-Chancellor, shall be deemed to be invalid at any time merely on the ground that -

(a) any of the members of any such authority, body or committee are not elected, appointed, nominated or co-opted or for any other reason are not available to take office at the time of the constitution or to attend any meeting thereof or any person is a member in more than one capacity or there is any other defect in the constitution thereof or there are one or more vacancies in the offices of members thereof;"

**१५.** खरे म्हणजे विद्यापीठाने किंवा कुलगुरुंच्या कार्यालयाने किंवा कुलपतींच्या कार्यालयाने त्यांनी केलेली कृती पूर्णपणे कायदेशीर असल्यामुळेच तक्रारकर्त्यांच्या निवेदनावर कोणतीही कारवाई केली नाही. तक्रारकर्त्यांनी शेवटी हे प्रकरण याचिकाकर्ते म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे याचिकेच्या स्वरूपात दिनांक १ फेब्रुवारी २०२३ रोजी दाखल केले. नागपूर खंडपीठासमोरील ही २०२३ ची याचिका क्रमांक ८४७ होय. या याचिकेमध्ये सुद्धा याचिककर्त्यांकडून मा.उच्च न्यायालयासमोर "Points to be considered" या मथळ्याखाली एकच मुद्दा उपस्थित करण्यात आला असून तो मुद्दा पुढीलप्रमाणे आहे. :- "In absence of complete Coram of Senate as contemplated under Section 28 (2) of The Maharashtra Public Universities Act, 2016, whether the Registrar is justified to hold Special Meeting of Senate for election/nomination of Members of Senate on the Management Council, Academic Council, Grievance Committee and other bodies of the S.G.B. Amravati University?"

**१६.** या याचिकेमध्ये न्यायालयाला करण्यात आलेल्या प्रार्थना खंडामध्ये प्रार्थनेचा (Prayer Clause) पहिलाच परिच्छेद हा पुढीलप्रमाणे आहे :-

"(i) Hold and declare that due to vacancies in the office of the Vice Chancellor, Pro-Vice Chancellor, Deans and for want of nominations of 16 members by the Hon'ble Chancellor and 4 members by the Vice Chancellor, 'the Senate' as contemplated under Section 28 (2) of The Maharashtra Universities Act, 2016 for the S.G.B. Amravati University is not duly constituted and accordingly, the decision of the respondent no. 2 to proceed with the further election and nominations of senate members on the major authorities and committees of the Amravati University is patently illegal;" विद्यापीठ कायद्याच्या खंड १४३ च्या तरतुदींची माहिती नसल्यामुळे केलेली ही याचिका मा.उच्च न्यायालयासमोर याचिकाकर्त्यांना मागे घ्यावी लागली, हा नंतरचा भाग झाला.

*सहपत्र : ५ (परिच्छेद ३३ पहा)*

**GOVERNOR'S SECRETARIAT**

Raj Bhavan,
Malbar Hill, Mumbai - 400035
No. RB/SGBAU-2023/CR-379/Edn. 1/240

**9th February 2023**

Respected Sir,

Please refer to your letter D.O.No. SGBAU/1/121/A-/2023 dated Feb., 2023, regarding the Special Meeting of the Senate.

I am directed to inform you that the Hon'ble **Chancellor has accorded his approval to the University's proposal to postpone the Special Meeting of the Senate to be held on 10th February 2023.**

With regards,

Yours sincerely,
**(R.S.Kadam)**
Under Secretary to the Governor (Edn.)

**Dr.Pramod Yeole,**
I/c. Vice-Chancellor,
Sant Gadge Baba Amravati University,
Amravati-444602.

**१७.** दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी विद्यापीठाच्या कुलसचिवांनी निवडणुकीसाठीच्या सिनेटच्या विशेष सभेची नोटीस काढली. त्या तारखेपासून तर दिनांक ३ फेब्रुवारी २०२३ पर्यंत म्हणजे १०-१५ दिवसांच्या काळामध्ये अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुंना किंवा प्रभारी कुलगुरुंना तसेच विद्यापीठाच्या कुलपतींना किंवा कुलपतींच्या कार्यालयाला निवडणुकीची विशेष बैठक रद्द करण्याबाबत किंवा पुढे ढकलण्याबाबत करण्यात आलेल्या तक्रारींवर कोणतीही कारवाई करण्याची आवश्यकता वाटली नाही. याचे **पहिले कारण** म्हणजे नोव्हेंबर २०२२ पर्यंत प्राधिकरणांच्या निवडणुका होवून नवीन प्राधिकरणे अस्तित्वात यायला पाहिजी होती, मात्र तसे न झाल्यामुळे अगोदरच या कामास बराच विलंब झालेला होता. **दुसरे व सर्वात महत्त्वाचे कारण** म्हणजे विद्यापीठ कायद्याच्या कलम १४३ मधील तरतुदींचा विचार करता निवडणुकीसाठी सिनेटची विशेष सभा बोलाविण्यामध्ये कोणताही बेकायदेशीरपणा नव्हता. **तिसरे कारण** असे की निवडणुकीची प्रक्रिया एकदा सुरू झाली की त्यामध्ये बाधा आणणारी कोणतीही कृती करणे हे बेकायदेशीरपणाचे आहे, असे मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी स्थापित केलेले आहे. त्यामुळे या तक्रारींवर कोणतीही कारवाई झाली नाही.

**१८.** आता दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या घटनाक्रमाचा आढावा घेणे आवश्यक आहे. अमरावती विद्यापीठाच्या तत्कालीन मा.कुलगुरुंच्या दुर्दैवी व दुःखद निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रभारी कुलगुरू म्हणून डॉ.प्रमोद येवले यांची महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी नेमणूक केली. दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी ते औरंगाबाद येथून अमरावतीला आले व त्यांनी कुलगुरू पदाचा प्रभार स्वीकारला. त्यानंतर विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांची एक बैठक घेतली व आपल्या काही तासांच्या या मुक्कामात त्यांनी मा.कुलपतींच्या कार्यालयाला एक संपूर्णपणे बेकायदेशीर मजकुराने भरलेले पत्र पाठविले व दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणुकीसाठी बोलाविण्यात आलेली सिनेटची विशेष सभा पुढे ढकलण्याची परवानगी मागितली व त्या दिवशी त्यांनी अमरावतीच्या मुक्कामामध्ये केलेले शेवटचे काम म्हणजे पत्रकार परिषद घेऊन १० तारखेची बैठक पुढे ढकलण्याबाबतची आपण मा.कुलपतींना विनंती केलेली आहे असे जाहीर केले.

**१९.** दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रभारी कुलगुरू डॉ.प्रमोद येवले यांनी मा.कुलपतींच्या कार्यालयाला पाठविलेले पत्र सोबत **सहपत्र : २** म्हणून प्रसृत केलेले आहे. या पत्रातील परिच्छेद दोन शब्दशः जसाच्या तसा पुढीलप्रमाणे आहे. :-

"In this respect, it is to inform you that **various**

*सहपत्र : ६ (परिच्छेद ३४ पहा)*

***संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ***

क्र. संगाबाअवि/१/१२१/ए-१६६/२०२३

दूरध्वनी : २६६८०७३, २६६८१६७, २६६८१२० ई-मेल आयडी : reg@sgbau.ac.in

**दिनांक : ९ फेब्रुवारी २०२३**

प्रति,
सर्व सन्मा. सदस्य, अधिसभा,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**विषय :** विशेष अधिसभा ... दिनांक १० फेब्रुवारी २०२३ निवडणूक/सभा स्थगितीबाबत...

**संदर्भ** : (१) जा.क्र. संगाबाअवि/१/१२१/ए-९६/२०२३ दि. २०.१.२०२३

(२) मा.कुलपती कार्यालयाचे पत्र क्र. RB/SGBAU-2023/CR-379/Edn. 1/240, dt. 9.2.2023.

महोदय/महोदया,

उक्त संदर्भीय क्र. २ वरील **मा.कुलपती कार्यालयाच्या प्राप्त मान्यतेनुषंगाने कळविण्यात येते की, शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक कामकाजासाठी होणारी अधिसभेची विशेष सभा तूर्तास स्थगित करण्यात येत आहे.**

सभा विषयक पुढील सूचना यथावकाश आपणांस कळविण्यात येईल.

तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू
**(डॉ.तुषार देशमुख)** कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

सर्व प्रशासकिय अधिकारी/शैक्षणिक विभाग, प्रमुख, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना माहितीस्तव.

**representations** have been received through e-mails from some members of Senate, **for cancellation of the said meeting to the University and your office also. In the light of points raised through representations, it is my duty to elaborate the factual information in this regard. A petition filed by some members of Senate before High Court for cancelling the said meeting."**

*सहपत्र : ७ (परिच्छेद ३१ पहा)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH, NAGPUR.**

**WRIT PETITION NO. 1001/2023**

Dr. Ravindra s/o Narayanrao Mundre and another -Vs.- TheHon'ble Chancellor, Raj Bhavan, Mumbai and others.

Mr. Firdoz Mirza and Mr. A.I. Sheikh, Advocates for the petitioners. Ms. N.P. Mehta, AGP for respondent no1./State. Mr. J. B. Kasat, Advocate for respondent nos.2, 3 and 4.

**CORAM**

**SUNIL B. SHUKRE & MRS. VRUSHALI V.JOSHI, JJ**

**DATE : 10/02/2023**

**1.** Heard.

**2.** Learned AGP for respondent no.1 and learned counsel for respondent nos.2, 3 and 4 make a request for grant of further time to file their respective replies in the matter. Both of them oppose the grant of interim relief by this Court to the petitioners.

**3.** Time can always be granted to the respondents to file their respective replies in the matter and accordingly it is granted. **However, the question is whether the Vice Chancellor of Amravati University has the power to send proposal seeking adjournment or postponement of the meeting even before the meeting is held, to the Hon'ble Chancellor and further question is even if such proposal is received whether the Hon'ble Chancellor has the power to consider and decide it.**

**4.** Mr. Mirza, learned counsel for the petitioners submits that neither of these authorities possess any such power like moving a proposal for seeking adjournment of a meeting scheduled to be held in accordance with the approved schedule of election or election programme in common parlance and granting it under the applicable Statute i.e. Uniform Statute 1 of 2017. He further submits that even if the provisions of Uniform Statute 4 of 2019, which is a general statute, are held to be applicable to the procedure to be followed for holding elections to various authorities in terms of the procedure prescribed under the special Uniform Statute 1 of 2017, still, no proposal even before holding of the meeting of the Senate could have been moved by anybody including its Chairman especially when admittedly the petition was pending before this Court.

**5.** Shri Kasat, learned counsel for the University submits that this is a case wherein Hon'ble Chancellor has granted approval for the special meeting of Senate to be held on 10.2.2023 in terms of Section 28 (4) of the Maharashtra Public Universities Act, 2016 (in short "Act of 2016) and therefore, the Hon'ble Chancellor would also have the power to postpone the meeting of the senate or change the date of the meeting. He further submits that power of the Vice Chancellor is restricted to only approving of the election programme in terms of Section 7 of Statute of 1 of 2017 but, ultimately it is the Hon'ble Vice Chancellor, who has the power to fix the date of the meeting of the senate under Section 28(4) of the Act of 2016. Therefore, he submits that the impugned approval granted by the Hon'ble Chancellor cannot be assailed by the petitioner on any ground.

**6.** So far as the submission that there is no provision whatsoever in Uniform Statute 1 of 2017 for moving of proposal for postponement of meeting of the Senate or approving of the proposal for postponement of the Senate meeting by the Hon'ble Chancellor is concerned, learned counsel for the petitioners is right in his submission. We have gone through the provisions made in Uniform Statute 1 of 2017 and we have not come across any such provision having been made in this regard. **Learned AGP as well as learned counsel for the University could not point out to us any such provision being present there in Uniform Statute 1 of 2017. Then the question would arise as to under which provision of law the proposal for postponement of a Special meeting of the Senate which was scheduled for holding of elections to various authorities of University could have been made by the Vice Chancellor and under which provision of law such proposal could have been approved by the Chancellor.**

**7.** Section 28 (4) of the Act of 2016 is relevant in this regard and for the sake of convenience, it is reproduced as under:-

*"The Senate shall meet at least twice a year on the date to be fixed by the Chancellor".*

**8.** A bare perusal of the aforesaid provision creates an impression in a prima facie way that power given to the Hon'ble Chancellor to fix the date of the Senate meeting is plenary. **It vests the Hon'ble Chancellor sole privilege of fixing of date of Senate meeting. This provision of law does not specify that this power also includes the power to postpone the meeting and fix it on some other date.** However, it is possible to argue that a power to do a thing for a particular date also includes a power to do the same thing for some other date and this way, there would be an implied power conferred upon the Chancellor to adjourn or postpone the Senate meeting by fixing another date. **But, in the present case, the meeting which was to be held was a special meeting and it was for the purpose of holding of elections to various authorities of the University.** The schedule of election programme in the present case, was also approved by the Vice Chancellor in terms of his power under Section 7 of the Uniform Statute 1 of 2017. The procedure for conducting of elections of various authorities and bodies of Universities is governed by the provisions of Uniform Statute in 1 of 2017 and this statute does not contemplate postponement of any Senate meeting which is scheduled for holding of elections, after seeking due approval of the authorities. Therefore, it is possible to argue as well that in so far as Special meeting of Senate is concerned, Section 28 (4) of the Act of 2016 would have to be read in conjunction with the provisions prescribing procedure for conducting elections of various authorities in the Uniform Statute of 1 of 2017. Then, the mandate of our Constitution is that elections in democratic India must be held in a free and fair manner and that there should not be any attempts at interfering with the election process, once it has commenced, except in extra-ordinary situations.

**9.** Considering the above referred possibilities and also the question that the impugned approval granted by the Hon'ble Chancellor raises an issue - whether or not it amounts to a step interfering with conduct of free and fair elections, the cardinal principle enshrined in our Constitutional philosophy, **we are of the view that interim relief deserves to be granted and accordingly, we direct that the impugned approval dated 9.2.2023 granted by the Hon'ble Chancellor is hereby stayed till further order.**

**10.** Stand over to 16th February, 2023.

**JUDGE** **JUDGE**

**२०.** प्रभारी कुलगुरुंनी पाठविलेल्या या पत्रातील दुसऱ्या परिच्छेदामध्ये वापरलेली सर्वच्या सर्व शब्दरचना ही पोरकटपणाची, उथळपणे वापरण्यात आलेली थिल्लर शब्दरचना आहे असे स्पष्टपणे दिसून येते. कसे ते पहा.

**(i)** "Various representations received in the University and your office" अशी मोघम शब्दरचना त्यांनी या परिच्छेद दोन मध्ये वापरलेली आहे. कुलपतींच्या कार्यालयात किंवा विद्यापीठाच्या कार्यालयात प्राप्त झालेली विविध निवेदने ही शब्दरचना मुळात सडकछाप स्वरूपाची आहे. विद्यापीठाचे कुलगुरू विद्यापीठाच्या कुलपतींना निवडणुकीची सभा पुढे ढकलण्याबाबत परवानगी मागतात तेव्हा ते निश्चित कोणत्या निवेदनाच्या बाबतीत बोलत आहेत हे त्यांनी काटेकोरपणे नमूद करणे आवश्यक होते. तसे त्यांनी या आपल्या पत्रात केलेले नाही.

**(ii)** विद्यापीठाच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या निवेदनांवर स्वतः कुलगुरुंनी काही भाष्य करणे यामध्ये हरकत घेण्यासारखे काही नाही. मात्र राज्यपालांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आलेल्या काही निवेदनांवर ती निवेदने त्यांच्याकडे त्या कार्यालयाने पाठविलेली नसतांना भाष्य करण्याचे कोणतेही अधिकार कायद्याने त्यांना दिलेले नाहीत हे ठाऊक असतांना त्यांनी त्यावर भाष्य करणे निव्वळ पोरकटपणाचे होय. आणखी वेगळ्या भाषेत सांगायचे झाल्यास "मा.राज्यपालांच्या कार्यालयातील कारकून काम करीत नाहीत. त्यांनी तेथे आलेली 'ही' निवेदने राज्यपालांच्या लक्षात आणून दिलेली नाहीत तेव्हा आता मी तुमचा कारकून म्हणून काम करायला तयार आहे व ही तुमच्या कार्यालयातील निवेदने तुमच्या लक्षात आणून देत आहे" अशी भूमिका विद्यापीठाच्या कुलगुरुंनी घेणे त्या पदाला कलंकित करणारे आहे.

**(iii)** "Cancellation of the said meeting" अशी तक्रारकर्त्यांची मागणी आहे या पद्धतीची मांडणी त्यांनी केलेली आहे. तक्रारकर्त्यांनी केलेल्या निवेदनांपैकी कोणत्या निवेदनात बैठक रद्द करण्याविषयी विनंती केली आहे हे त्यांनी आपल्या पत्रात नमूद केलेले नाही. इतकेच नव्हे तर त्यांनी बैठक रद्द करण्याविषयीची विनंती केली असतांना आपण मात्र ती बैठक पुढे ढकलण्याविषयी विनंती का म्हणून करीत आहोत? याविषयीचा कोणताही खुलासा त्यांच्या पत्रामध्ये नाही.

**(iv)** "In the light of points raised through representations" अशी शब्दरचना त्यांनी आपल्या या पत्रामध्ये वापरलेली आहे. या निवेदनांमधील कोणत्या मुद्यांमुळे (Points : अनेकवचनी) आपण ही विनंती करीत आहोत त्या मुद्यांचा उल्लेख सुद्धा त्यांनी आपल्या या पत्रामध्ये केलेला नाही.

**(v)** "It is my duty to elaborate the factual information in this regard" अशी मोघम व भंपकपणाची शब्दरचना त्यांनी आपल्या या पत्राच्या परिच्छेद दोनमध्ये वापरलेली आहे. पणे असे करीत असतांना मा.कुलपतींना ठाऊक नसलेली कोणतीही factual information त्यांनी या निवेदनामध्ये elaborate न करता तसे करणे "It is my duty" अशी भपकेबाज व भंपक शब्दरचना वापरलेली आहे.

**(vi)** दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी पाठविलेल्या या पत्रात त्यांनी "A petition filed by some members of Senate before High Court for cancelling the said meeting" (शब्दशः जसेच्या तसे) अशी शब्दरचना वापरलेली आहे. याचा सरळ सरळ अर्थ असा की, हे पत्र पाठवितांना तक्रारकर्त्यांनी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर दाखल केलेल्या याचिकेची त्यांना माहिती होती व प्रभारी कुलगुरू या नात्याने आपण त्या याचिकेमध्ये दुसऱ्या क्रमांकाचे प्रतिवादी आहोत ही बाबसुद्धा त्यांना माहीत होती. त्या याचिकेमध्ये बैठक रद्द करण्याविषयीची प्रार्थना आहे असेही त्यांनी या पत्रात नमूद केलेले आहे.

*सहपत्र : ८ (परिच्छेद ४१ पहा)*

To,
**The Hon'ble Chancellor,**
Malabar Hills, Mumbai.

**Sub :** For fixing a date of Special Meeting of election of Management Council and other authorities of SGB Amravati University.

**Ref : (i)** Order dated 10.02.2023 passed by the Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court in W.P. No. 1001/2023.

**(ii)** Order dated 06.02.2023 passed by the Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court in W.P. No. 847/2022.

**(iii)** Your Office Letter dated 09.02.2023.

Respected Sir,

**1.** That all the applicants are the elected Senate Members of the Sant Gadge Baba Amravati University, Amravati and some of them even enlisted as elected unopposed on various authorities of the University and only their declaration remains which is to be done in a special meeting which was scheduled on 10.02.2023 by order dated 20.01.2023.

**2.** That in view of the above reference no.(i), the Hon'ble High Court was pleased to grant stay to your office letter dated 09.02.2023 by which the special meeting which was scheduled on 10.02.2023 was postponed. The relevant observation of the Hon'ble Court Order is thus:

*"The mandate of our Constitution is that elections in democratic India must be held in a free and fair manner and that there should not be any attempts at interfering with the election process, once it has commenced, except in extra-ordinary situations.*

*Considering the above referred possibilities and also the question that the impugned approval granted by the Hon'ble Chancellor raises an issue - whether or not it amounts to a step interfering with conduct of free and fair elections, the cardinal principle enshrined in our Constitutional philosophy, we are of the view that interim relief deserves to be granted and accordingly, we direct that the* ***impugned approval dated 9.2.2023 granted by the Hon'ble Chancellor is hereby stayed till further order."***

**3.** Moreover, the Writ Petition No.847/2023 filed by three senate members praying for cancellation and postponement of meeting has already been directed to withdraw by the Hon'ble High Court and accordingly it has been withdrawn as per the order of this Hon'ble Court dated 06.02.2023. Therefore twice the Hon'ble High Court has entertained this issue and hence it is expected from your good office to fixed the date of special meeting on or before 16.02.2023.

4. That in view of the above, the order of the Hon'ble Chancellor dated 09.02.2023 postponing the election is stayed by the Hon'ble High Court, therefore it is necessary for your good office to fixed the date of special meeting as early as possible and possibly before the returnable date of the matter i.e. on or before 16.02.2023 in the interest of justice.

Hence this application.

**Amravati** **Date: 14.02.2023**

(Sr.No.) Name of Senate Members : Signatures

**(1)** Dr.P.B.Raghuwanshi **(2)** Dr.Ravindra Mundre **(3)** Dr.Subhash Gawande **(4)** Dr.Vijay Kapse **(5)** Dr.Archana Bobade **(6)** Dr.Prashant Wighe **(7)** Dr.Waghuley Sandeep **(8)** Dr.Vidyadhar Metkar **(9)** Mr.Kailash Chavhan **(10)** Mr.Nitin Tale

**Encl : (1)** Order dated 10.02.2023 passed by the Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court in W.P. No. 1001/2023. **(2)** Order dated 06.02.2023 passed by the Hon'ble Nagpur Bench of Bombay High Court in W.P. No. 847/2022. **(3)** Your Office Letter dated 09.02.2023.

**Copy to : (1)** Shri Santosh Kumar, Secretary to the Hon'ble Chancellor, Malabar Hills, Mumbai. **(2)** The Vice-Chancellor, SGB Amravati University, Amravati. **(3)** The Registrar, SGB Amravati University, Amravati.

**(vii)** मा.कुलपती व कुलगुरू हे दोनच प्रतिवादी असलेल्या या याचिकेमध्ये या दोघांनी केलेल्या संपूर्णपणे कायदेशीर कृतीला विरोध करण्याच्या भूमिकेला आपण जाहीरपणे पाठिंबा देत आहोत. आपले हे कृत्य भर राजकमल चौकात उभे राहून आपल्याच थोबाडात थप्पडा लगावण्याच्या कृतिसम आहे व तशीच लाजीरवाणी कृती करण्याची कुलपतींना आपण विनंती करीत आहोत एवढे समजण्याइतकी अक्कल कुलगुरुंना असू नये काय? प्रभारी झाले म्हणून काय झाले.

**(viii)** मला एक गोष्ट स्पष्टपणे नमूद केली पाहिजे की, कुलगुरुंची काही चूक झालेली आहे असे जर त्यांना प्रामाणिकपणे वाटत असेल तर ती चूक दुरुस्त करण्याची कृती करणे यात काहीही चूक नाही. सदरहू प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल झालेली आहे याची माहिती असतांना मा.न्यायालयात उपस्थित राहून "मी माझी चूक दुरुस्त करू इच्छितो" असे प्रतिपादन करणे हाच या प्रकरणी राजमार्ग होता. तो सोडून भर चौकात उभे राहून आपल्या तोंडात थप्पडा मारून घेण्याच्या वाममार्गाचा वापर त्यांनी का करावा हे न समजण्यासारखे आहे.

**(ix)** शिवाय "कुलगुरुंनी चूक केलेली आहे" असा आरोप करणारी याचिका न्यायालयात असतांना प्रतिवादी असलेल्या कुलगुरुंनी आमची काहीही चूक झालेली नाही हे आपले म्हणणे तेथे न मांडता बाहेर कवायती करणे हे न्यायव्यवस्थेप्रति अनादर दाखविणारे कृत्य होय. एवढे समजण्याइतकी बुद्धी कुलगुरुंना असू नये काय? प्रभारी झाले म्हणून काय झाले.

**(x)** याचिकाकर्त्यांनी बैठक रद्द करण्याविषयीची विनंती केलेली आहे याची माहिती कुलगुरुंना आहे तर मग प्रभारी कुलगुरू हे मा.कुलपतींना ही बैठक पुढे ढकलण्याबाबत विनंती का करीत आहेत? याबाबतचा कोणताही खुलासा त्यांनी या पत्रामध्ये केलेला नाही. "Cancelling the meeting" आणि "Postponing the meeting" या दोन शब्दरचनेमधील फरक प्रभारी कुलगुरुंना कळत नाही असा जो अर्थ यातून निघतो तो कुलगुरू या पदाची शोभा वाढविणारा नाही.

**(xi)** विद्यापीठांच्या कुलगुरुंनी किंवा कुलपतींनी याबाबतीत केलेली कृती ही पूर्णपणे कायदेशीर होती व त्यामुळेच त्या १०-१५ दिवसांत कुलगुरुंनी किंवा कुलपतींनी याबाबतीत कोणतीही कारवाई केली नाही. असे असतांना काही तासातच नव्याने आलेल्या प्रभारी कुलगुरुंसमोर असे कोणते नवीन मुद्दे आले की, ही बैठक पुढे ढकलण्याची त्यांना गरज वाटली. याबाबतचा कोणताही खुलासा या पत्रामध्ये त्यांनी केलेला नाही.

**२१.** प्रभारी कुलगुरुंनी मा.कुलपतींच्या कार्यालयाला पाठविलेल्या दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या या पत्रातील शेवटचा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे.:- **"Nominations from the Hon'ble Chancellor on the Senate are yet to receive and Senate is not fully constituted.** Hence, in the light of above facts, you are requested **to take orders of the Hon'ble Chancellor that the scheduled meeting may be postponed."** प्रभारी कुलगुरुंच्या या पत्रातील हा शेवटचा परिच्छेद

*सहपत्र : ९ (परिच्छेद ४४ पहा)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH, NAGPUR**

**WRIT PETITION NO.1001 OF 2023**

Dr. Ravindra S/o Narayanrao Mundre and another **Versus** The Hon'ble Chancellor, Mumbai, and others With Civil Application No.______ of 2023 In Writ Petition No.1001 of 2023 (Dated 2-3-2023) (Applicants : Sanket Sanjay Saoji and seven others)

Shri Firdos Mirza with Shri A.I. Sheikh, Advocates for Petitioners. Ms N.P. Mehta, Assistant Government Pleader for Respondent No.1. Shri J.B. Kasat, Advocate for Respondent Nos.2 to 4. Shri B.G. Kulkarni, Advocate for Applicants in Civil Application.

**CORAM**

**SUNIL B. SHUKRE & M.W. CHANDWANI, JJ.**

**DATE : 2nd MARCH, 2023**

**1.** Heard.

**2.** Perused the application of the nominated persons to be impleaded them as respondent Nos.5 to 12 in this petition. We do not think that now any purpose is going to be served by allowing this application, inasmuch as we have already granted hearing to Shri B.G. Kulkarni, learned counsel for these applicants.

**3.** With the assistance of Shri B.G. Kulkarni, learned counsel for the applicants, and also Shri Firdos Mirza, learned counsel for the petitioners, we have gone through the notification dated 28-2-2023 and another notification of the same date issued by the Hon'ble Chancellor and the Vice-Chancellor respectively. These notifications are annexed to the application of the newly nominated members of the Senate. They are marked as Documents 'A' and 'B' respectively. They show that now 10 members have been nominated by the Hon'ble Chancellor and 2 members have been nominated by the Vice Chancellor on the Senate of the University, thereby taking the tally of the members of the Senate to 69 from out of 76 members. The presence of 69 members on the Senate is sufficient to hold the elections. The notice of the elections was already issued by the Registrar of the University on 20-1-2023. As per this notice, the meeting of the Senate was to be held on 10-2-2023 for holding the elections only. Now we are informed by the learned counsel for the petitioners that another meeting of the Senate is scheduled to be held on 14-3-2023, and as per the agenda of this meeting, the list of the subjects begins with Subject No.3 and the agenda is silent about subject Nos.1 and 2. This agenda is taken on record and marked Document 'C' for the purpose of identification. This document does not make any reference to the subjects of elections. We are of the view that as on today there is sufficient number of members present on the Senate and that as the election notice was already issued, the elections can now be held by adding the subjects of elections as Subject Nos.1 and 2 to the agenda vide Document 'C'.

**4.** Shri Firdos Mirza, learned counsel for the petitioners, points out that Subject Nos.1 and 2 relate to the elections of the members under Section 30 of the Maharashtra Public Universities Act, 2016 and the elections of the members under Sections 32, 70 and 79 of the said Act, which are required to be added to the agenda.

**5.** In view of above, we are also of the opinion that if the elections to the various posts of authorities of the University are held, the purpose of this petition will stand served.

**6.** We, therefore, direct that the subjects of elections be added to the agenda vide Document 'C' as Subject Nos.1 and 2 and accordingly elections to various posts of the authorities of the University be held in accordance with the rules in the meeting of the Senate scheduled to be held on 14-3-2023 at about 12 noon.

**7.** The civil application as well as petition stand disposed of in above terms.

**(M.W. CHANDWANI, J.)** **(SUNIL B. SHUKRE, J.)**

वाचल्यानंतर त्यांच्या पोरकट व भिकारबुद्धीची कीव करण्याशिवाय पर्याय राहत नाही. मा.कुलपतींनी Nominations केलेले नाहीत, हे कुलपतींना किंवा त्यांच्या कार्यालयाला ठावूक नाही असे प्रभारी कुलगुरुंनी गृहीत धरलेले आहे, हा त्यांच्या पोरकटपणाचा व भिकारबुद्धीचा एक मोठा पुरावा म्हणावा लागेल.

**२१.२** विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की, अमरावती विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुंनी दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी मा.कुलपती महोदयांना हे जे पत्र पाठविले त्या पत्रामध्ये अमरावती विद्यापीठाच्या बाबत "Senate is not fully constituted" असे कळविले आहे. त्यांचे हे वर्तन पूर्णपणे लबाडीचे व असत्य असून कुलगुरू पदावर विराजमान झालेल्या एका अधिकाऱ्याने आपल्या वरिष्ठांना म्हणजे मा.कुलपतींना धडधडीत असत्य माहिती कळविणे हे अत्यंत लाजिरवाणे कृत्य असून त्याचा जेवढा करावा तेवढा निषेध थोडाच आहे. याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, सिनेटची पुन्हा करण्यात आलेली रचना पूर्ण झालेली असून त्याबाबतचे अधिकृत ज्ञापन (Notification) दिनांक २१ जानेवारी २०२३ रोजी सन २०२३ च्या अमरावती विद्यापीठाच्या गॅझेटमध्ये भाग दोनच्या पृष्ठ २४ वर प्रकाशित झालेले असून ते सोबत **सहपत्र : ३** म्हणून प्रसृत केलेले आहे. मा.उच्च न्यायालयासमोर आपली भूमिका मांडतांना हे ज्ञापन विद्यापीठातर्फे सादर करण्यात आले नाही यावरूनच त्यामागील लबाडीचा हेतू आणखी स्पष्ट होतो.

**२१.३** त्याशिवाय "Senate is not fully constituted" असे एक वाक्य त्यांनी या पत्रात वापरलेले आहे. मा.कुलपतींचे Nominations आले नाहीत तर सिनेटची रचना पूर्ण होत नाही अशा प्रकारची विद्यापीठ कायद्यातील कोणतीही तरतूद त्यांनी दाखवून दिलेली नाही. तशी कोणतीही तरतूद अस्तित्वातच नाही. विद्यापीठ कायद्याच्या कलम १४३ विषयीचे अज्ञान त्यांनी प्रकट केलेले आहे. कलम १४३ मधील ही तरतूद वर परिच्छेद १४ मध्ये नमूद केलेली आहे. "In the light of above facts" बैठक postpone करण्याचे आदेश मा.कुलपतींनी काढावेत अशी त्यांनी विनंती केलेली आहे आणि कुलपतींना माहिती नसलेल्या कोणत्याही above facts या पत्रामध्ये नमूद केलेल्या नाहीत.

**२२.** "तुमच्या कडून Nominations आल्याशिवाय येथील निवडणुका पार पडायला नको" अशी सरळसरळ भूमिका आपण मा.राज्यपालांना कळवित आहोत, ही भूमिका टोकाच्या पक्षपातीपणाची आहे एवढे समजण्याइतकी बुद्धी कुलगुरुजवळ असू नये काय? प्रभारी झाले म्हणून काय झाले. कुलगुरुंनी साधुसंतासारखे वागले पाहिजे अशी अपेक्षा चुकीचीच आहे हे मान्य केले तरी पक्षपातीपणाचे प्रदर्शन करतांना अंगावरचे सर्वच कपडे फेकून नागडे होवून रस्त्यावर उघडे फिरण्याइतक्या पक्षपातीपणे वागू नये एवढे कुलगुरुंना कळले पाहिजे ही किमान अपेक्षा लोकांनी केली तर त्यात काय चुकीचे आहे?

**२३.** शनिवार, दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी औरंगाबादहून अमरावती येथे आगमन, कुलगुरू पदाचा कार्यभार स्वीकारणे, कुलपतींना पत्र पाठविणे व त्यानंतर पत्रकार परिषद, असा काही तासात कार्यक्रम पार पाडून प्रभारी कुलगुरू औरंगाबादकडे रवाना झाले. या मुक्कामात अमरावती विद्यापीठाच्या सिनेटची निवडणुकीसाठीची विशेष सभा पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती करणारे पत्र प्रभारी कुलगुरुंनी मा.कुलपतींना पाठविले. ती बाब त्यांनी त्याच दिवशी पत्रकार परिषद घेऊन जाहीर केली. दुसऱ्या दिवशी रविवार, दिनांक ५ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या सर्व वृत्तपत्रांमध्ये त्याबाबतीतला मजकूर छापून आला होता.

**२४.** निवडणुकीसाठी बोलाविण्यात आलेली सिनेटची विशेष सभा पुढे ढकलण्याच्या कुलगुरुंच्या या योजनेमुळे सिनेट सदस्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला होता. खरे म्हणजे अशी सभा पुढे ढकलण्याविषयीची मागणी करण्याचा कुलगुरुंना व ती मागणी मान्य करून सभा पुढे ढकलण्याची परवानगी देण्याचा कुलपतींना कोणत्याही कायद्याने किंवा नियमांने अधिकार दिलेला नाही. सिनेट बैठक सुरू झाल्यांनतर ती सभा पुढे ढकलण्याचा निर्णय फक्त सिनेटमध्येच केला जाऊ शकतो अशी स्पष्ट तरतूद सन २०१९ च्या एकरूप परिनियम ४

*सहपत्र : १० (परिच्छेद ५६ पहा)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY NAGPUR BENCH : NAGPUR**

**WRIT PETITION NO. 5348 OF 2017**

**(Dr. Deepak Bapuraoji Punse .vs. Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University & others)**

Mr. B.G. Kulkarni, Advocate for petitioner, Mr. R.D. Wakode, Advocate for respondent no.1, Mr. H.R. Dhumale, A.G.P. for respondent no. 2. Mr. P. Gode, Advocate for respondent nos. 3 & 4, Mr. N.S. Bhelkar, Advocate for respondent no.5.

**CORAM : B.P. DHARMADHIKARI & MRS. SWAPNA S. JOSHI, JJ.**

**DATED : DECEMBER 4, 2017.**

1] Heard.

2] In view of reply filed by respondent no.2 Joint Director accepting contention of petitioner, we do not find it necessary to refer to facts at length.

3] Qualifications for the post of Principal of an educational college are stipulated by U.G.C. Regulations dated 30.6.2010 which mandates Ph.D. in Education, i.e. a qualification after M.Ed. Nagpur University has thereafter issued a Direction No.4 of 2012 and accepted it. Even State Government through its Department of Higher & Technical Education has on 15.3.2012 laid down that while appointing anybody as an officiating Principal, available duly qualified Lecturer should only be given that charge.

4] In this backdrop, respondent no.5 who does not possess either M.Ed. or Ph.D. in Education has been given additional charge and Pro-Vice-Chancellor of the respondent no.1 University has given approval to it on 28.7.2017. This has been questioned by petitioner.

5] There is no doubt about eligibility or qualifications of petitioner.

6] Similarly, educational qualifications of respondent no.5 are not in doubt. However, as a Librarian he has put in more service and as he is treated as teacher, he is senior to petitioner but then as is apparent from above-mentioned U.G.C. Regulations adopted by University or mandate of State Government, as he is not holding Ph.D. in Education, he cannot be made additional Principal.

7] Explanation furnished by respondent University is totally ignoring the UGC Regulations which are in force since last more than seven years. The vacancy has arisen on 4.7.2017 and in defence University is relying upon provisions which were in force before 30.6.2010. We, therefore, find absence of bonafides in the defence of University.

8] It is apparent that in terms of UGC Regulations and the mandate of State Government as contained in G.R. dated 15.3.2012, petitioner needs to be given charge as officiating additional Principal of the college run by respondent no.3.

9] Accordingly, we set aside approval given to respondent no.5 by respondent no.1 and direct it to grant the same to petitioner.

10] We also caution Pro-Vice-Chancellor of University and warn that in future if such approach is noticed, appropriate restraining orders, including orders restraining him from functioning as Pro-Vice-Chancellor shall be passed by this Court.

11] Accordingly, the Writ Petition is allowed and disposed of. No costs.

**Judge** **Judge**

च्या परिच्छेद १० मध्ये आहे. प्रथम नागपूर विद्यापीठाच्या कोर्टावर व त्यानंतर नागपूर विद्यापीठाच्या सिनेटवर सन १९६९ पासून तर सन १९८५ पर्यंत सदस्य म्हणून व त्यानंतर अमरावती विद्यापीठाच्या सिनेटवर सन १९८३ पासून तर सन १९९९ पर्यंत सिनेट सदस्य म्हणून मी काम केलेले आहे. या कालखंडामध्ये निवडणुकीसाठीची विशेष सभा अशारीतीने पुढे ढकलण्यात आल्याचे मी कधीही पाहिले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे तशी कायद्यात तरतूद नाही हेच होय.

**२५.** अचानकपणे कुलगुरुंनी घेतलेल्या या पवित्र्यामुळे अनेक सिनेट सदस्यांनी रविवारी दिनांक ५ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी संघटनेचे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी, अमरावती विद्यापीठाचे माजी कार्यकारी मंडळ सदस्य व अमरावतीचे माजी महापौर श्री.मिलिंद चिमोटे व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष व माजी विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांची भेट घेऊन याबाबत काहीतरी उपाययोजना केली पाहिजे अशी भावना व्यक्त केली. या सर्वांची प्रा.बी.टी.देशमुख यांच्या निवासस्थानी एक बैठक झाली व प्रभारी कुलगुरुंनी हा अत्यंत अन्यायकारक व चुकीचा निर्णय घेतला असून त्याला कायदेशीररीत्या उत्तर दिले पाहिजे असा निर्णय घेण्यात आला. संघटनेचे विधी सल्लागार ॲड.फिरदोस मिर्झा व ॲड.अशफाक शेख यांच्याशी फोनवरून संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ते दोघेही त्या दिवशी वर्धा येथे एक समारंभामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यामुळे त्यांच्याशी संपर्क होत नव्हता. प्रा.बी.टी.देशमुख यांनी ॲड.फिरदोस मिर्झा यांना केलेला फोन सुद्धा उचलल्या गेला नाही, मात्र व्याख्यान संपल्याबरोबर ॲड.फिरदोस मिर्झा यांनी प्रा.बी.टी.देशमुख यांना परत फोन केला. "गेल्या दोन-तीन महिन्यामध्ये 'मेडिकल इर्मजन्सी' साठी मी नागपूरला दोन-तीन वेळा येऊन गेलो, पण आज आता 'लिगल इर्मजन्सी' आल्यामुळे ताबडतोब नागपूरला तीन वाजेपर्यंत आपल्या कार्यालयात पोहचण्याचा आमचा विचार आहे." असे प्रा.बी.टी.देशमुख यांनी त्यांना सांगितले. त्यावर ॲड.फिरदोस मिर्झा असे म्हणाले की, "मी सध्या वर्धा येथे आहे. 'लिगल इर्मजन्सी' आहे असे तुम्ही म्हणता तर तसेच असले पाहिजे. येथील काम आटोपून मी ताबडतोब नागपूरला पोहचतो; पण तुम्ही तीन-चार वाजता न येता पाच वाजता या."

**२६.** त्याप्रमाणे मी स्वतः, डॉ.प्रवीण रघुवंशी, श्री.मिलिंद चिमोटे तसेच काही सिनेट सदस्य आम्ही बरोबर पाच वाजता नागपूर येथे ॲड.फिरदोस मिर्झा यांच्या कार्यालयामध्ये पोहचलो. ते स्वतः व त्यांचे सहकारी ॲड.अशफाक शेख हेही उपस्थित होते. बरोबर पाच वाजता आमच्या बैठकीला सुरुवात झाली. इर्मजन्सी काय आहे? याची कल्पना दिल्यावर ॲड.फिरदोस मिर्झा यांनी दुसऱ्या दिवशीच्या मा.उच्च न्यायालयाच्या त्यांच्या टेबलवर असलेले 'कामकाजाचे बोर्ड' पाहिले व असे सांगितले की, ही सिनेटची विशेष सभा तहकूब करण्यासाठी मा.नागपूर खंडपीठासमोर करण्यात आलेली सन २०२३ ची याचिका क्रमांक ८४७ ही उद्या कोर्टासमोर सुनावणीला आहे. कोर्टात एकतर्फी कोणतीही कारवाई होऊ नये म्हणून हस्तक्षेप अर्ज (Intervention Application) करणे आवश्यक आहे असे मला वाटते. हस्तक्षेप अर्ज कोर्टाने संमत केला तर त्या ठिकाणी आपल्याला आपले म्हणणे मांडता येईल. निवडणुकीच्या कार्यक्रमाला कुलगुरुंनी पुढे ढकलण्याचा पवित्रा घ्यावा याबद्दल ॲड.फिरदोस मिर्झा यांनी आश्चर्य व्यक्त केले.

**२७.** हस्तक्षेप अर्जामध्ये पहिले अर्जदार डॉ.रवींद्र मुंद्रे व दुसरे अर्जदार डॉ.सुभाष गावंडे राहतील हेही ठरले. डॉ.रवींद्र मुंद्रे हे तक्रार निवारण समितीवर अविरोध निवडून आले असून त्यांच्या निवडणुकीचा निर्णय १० फेब्रुवारीच्या बैठकीत जाहीर झाला असता पण आता बैठक तहकूब केल्यावर तो निर्णयसुद्धा लांबणीवर पडणार होता. डॉ.सुभाष गावंडे हे स्थायी समितीसाठी उमेदवार म्हणून उभे होते व बैठकच होणार नसल्यामुळे निवडणूकसुद्धा लांबणीवर पडणार होती. रात्री बराच उशीरापर्यंत हा हस्तक्षेप अर्ज तयार करण्याचे काम सुरू होते. तो दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी मा.खंडपीठापुढे कामकाज सुरू होताच सादर करण्यात आला.

**२८.** मा.न्यायमूर्ती श्री.सुनील शुक्रे व मा.न्यायमूर्ती श्रीमती वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमोर सोमवारी सकाळी पहिल्या तासातच सिनेट बैठक रद्द करण्याची विनंती करणारी सन २०२३ ची याचिका क्रमांक ८४७ ही सुनावणीला आली. ती सुनावणीला आली असतांना ॲड.फिरदोस मिर्झा यांनी उभय अर्जदारांचा हस्तक्षेप अर्ज मा.खंडपीठासमोर सादर केला व हस्तक्षेप करण्याची आवश्यकता का म्हणून आहे याविषयीचे प्रतिपादन केले. मुख्यत्वे दोनही हस्तक्षेपकर्ते या सुनावणीमुळे प्रभावित होणारे आहेत, ही बाब त्यांनी नमूद केली. सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यावर मा.न्यायमूर्तींनी "This application deserves to be allowed. The application is accordingly allowed." असे आदेश पारित केले व त्यानंतर सन २०२३ च्या याचिका क्रमांक ८४७ वर सुनावणी सुरू झाली.

**२९.** ॲड.फिरदोस मिर्झा यांनी न्यायालयासमोर जे मुख्य मुद्दे मांडले ते असे की, निवडणुकीचा कार्यक्रम शेवटच्या टप्प्यात आलेला असतांना अशा रीतीने सिनेटची बैठक पुढे ढकलण्याची विनंती करण्याचा कुलगुरुंना व ती विनंती मान्य करण्याचा कुलपतींना कायद्यातील कोणत्याही तरतुदीने अधिकार दिलेला नाही. मा.न्यायमूर्तींनी याचिकाकर्त्याच्या वकिलांना अशी तरतूद कोठे आहे काय? याबाबत विचारणा केली असता तसे त्यांना दाखवून देता आले नाही. स्वतः मा.न्यायमूर्तींनीसुद्धा निवडणुकीसाठीची बैठक अशा रीतीने तहकूब करणे हे निःपक्षपातीपणे निवडणुकीचे संचालन करण्याच्या धोरणाच्या विरोधात आहे असे मत व्यक्त केले. तुमचे याचिकाकर्ते कोठे आहेत? असेही त्यांनी याचिकाकर्त्यांच्या वकिलांना विचारले व याचिकाकर्ते न्यायालयासमोर हजर नाहीत हे लक्षात आल्यानंतर दुपारच्या सत्रापर्यंत ही सुनावणी तहकूब करू. "तुम्ही तुमच्या याचिकाकर्त्यांकडून सूचना घ्या व दुपारच्या सत्रात काय ते सांगा. मुख्य म्हणजे असा अधिकार कुलगुरुंना कोणत्या तरतुदीने दिलेला आहे याबाबतीत तुम्हाला सांगावे लागेल." असेही मा.न्यायमुर्तींनी सांगितले.

**३०.** दुपारच्या सत्रामध्ये पुन्हा ज्यावेळेला याचिका सुनावणीला आली त्यावेळेला कुलगुरुंना व कुलपतींना असे अधिकार कोणत्या कलमाप्रमाणे किंवा नियमाप्रमाणे आहेत हे दाखविता न आल्याने व मा.उच्च न्यायालयाचा निर्णय आपल्या विरोधात जात आहे हे लक्षात आल्यामुळे याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी "आपण याचिकाकर्त्यांच्या सूचनेवरून याचिका मागे घेत आहोत. तशी न्यायालयाने आपल्याला परवानगी द्यावी" अशी विनंती केली व ती विनंती मा.न्यायालयाने मान्य केली. न्यायालयाच्या आदेशात ही बाब पुढील शब्दात नमूद झालेली आहे.:-

"Learned counsel for the petitioners, on instructions, seeks leave to withdraw the petition. Leave granted. Writ petition is disposed of as withdrawn." दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजी हस्तक्षेप अर्ज मान्य करणारे व सन २०२३ ची याचिका क्रमांक ८४७ निकाली काढण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने पारित केले.

**३१.** दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे जे आदेश झाले त्यानंतर डॉ.रवींद्र मुंद्रे व डॉ.सुभाष गावंडे या दोन

*सहपत्र : ११ (परिच्छेद ५७ पहा)*

**IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : NAGPUR BENCH : NAGPUR.**

**Civil Application (W) No.116 of 2018 In Writ Petition No.5348 of 2017 (D)**

**(Dr. Deepak Punse V Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur thr its Registrar, Nagpur and others)**

Shri R.D. Wakode, Advocate for petitioner. Shri B.G. Kulkarni, Adv for petitiner. Shri H.R. Dhumale, AGP for resp. no.2. Shri P. Gode, Adv for resp. nos. 3 and 4. Shri N.S. Bhelkar, Adv for resp. no.5.

**Coram : B.P. Dharmadhikari & Mrs. Swapna Joshi, JJ.**
**Dated : 19th January, 2018.**

Heard.

2] We expunge all remarks of this Court in order dated 04-12-2017. If such an error is again brought to the notice of this Court, the remarks sought to be expunged shall revive and carry its weight.

3] With these observations, we expunge the observations in paragraph 10 of the order dated 04-12-2017 in Writ Petition No.5348 of 2017 against applicant.

4] Civil Application is accordingly allowed and disposed of. No costs.

**JUDGE** **JUDGE**

सिनेट सदस्यांनी विद्यापीठाच्या कुलगुरुंना एक निवेदन सादर केले. या निवेदनाच्या परिच्छेद ३ व ४ मध्ये पुढीलप्रमाणे माहिती नमूद करण्यात आली होती. :-

**"3. That after hearing the parties in detailed, the Hon'ble High Court on 06.02.2023 has refused to postpone or cancel the meeting scheduled on 10.02.2023.** That during the hearing the Hon'ble Court has observed that election has been commenced after the due permission granted by the Hon'ble Chancellor and now only the last stage of meeting is left. **The Hon'ble Court further observed that there is no rule/provision/ statute which permits anyone to postpone the election and finally the petition has been disposed of as withdrawn.**

**4.** That in view of the above order of the Hon'ble Court, it is clear that the meeting of election/nomination cannot be cancel or postponed for any reason **and no provision of law is available in that respect. Therefore, any act in contravention to this will be contemptuous of the Hon'ble High Court.** Hence by this application it is humbly requested from your good office that no order or direction in respect of cancellation or postponement of election may be passed without giving notice and hearing to the applicants, otherwise it will be a contemptuous act and of violative of principles of Natural Justice as per Art 14 of the Constitution of India." त्यांचे हे दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजीचे निवेदन सोबत **सहपत्र : ४** म्हणून प्रसृत केलेले आहे. **त्याच अर्थाचे निवेदन त्यांनी मा.कुलपतींना ई-मेलद्वारे पाठविले.**

**३२.** दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजी न्यायालयात उपरोक्त घडामोडी होत असतांना सिनेटचे सदस्य श्री.अविनाश बोर्डे यांनी त्याच दिवशी मा.कुलपतींचे सचिव श्री.संतोष कुमार यांना ई-मेलद्वारे एक पत्र पाठवून पुढीलप्रमाणे विनंती केली होती. :-

"निवडणुकीच्या घोषित कार्यक्रमाप्रमाणे अविरोध निवडून आलेल्या चार सदस्यांची अधिकृत सूचना जशी विद्यापीठाने जाहीर केली तशीच विविध प्राधिकरणांवर निवडून जाण्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादीसुद्धा (List of contesting Candidates) निवडणुकीच्या घोषित कार्यक्रमाप्रमाणे दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी अधिकृतपणे अधिसूचित केलेली आहे. दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी व्यवस्थापन परिषदेवर निवडून जाण्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या **अधिकृत यादीमध्ये मी अविनाश मधुकरराव बोर्डे एक उमेदवार म्हणून नमूद आहे.** इतरही उमेदवारांची यादी या अधिसूचनेत नमूद आहे. १० तारखेला सिनेट बैठकीत होणाऱ्या निवडणुकीमध्ये विविध प्राधिकरणांसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी अधिकृतपणे ठरलेल्या निवडणुकीच्या कार्यक्रमाप्रमाणे दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी अधिसूचित करणाऱ्या **अमरावती विद्यापीठाच्या कुलगुरुंनी त्याच तारखेला पत्र लिहून ही बैठक पुढे ढकलण्याबाबत विनंती करावी ही गोष्ट निवडणुकीच्या कार्यक्रमाशी छेडछाड करणारी असून अत्यंत बेकायदेशीर व कोणताही अधिकार नसतांना मा.कुलगुरुंनी केलेली आहे.** मा.कुलपतींच्या ही गोष्ट लक्षात आणून द्यावी अशी विनंती आहे." याच पत्रात त्यांनी शेवटी असेही नमूद केले होते की,

"**इतक्या उपर मा.कुलपतींनी संदर्भ (३) वरील कुलगुरुंच्या निवेदनावर काही निर्णय घेण्याचे ठरविल्यास असा निर्णय घेण्यापूर्वी आमचे याबाबतचे म्हणणे ऐकून घेण्यात यावे.** याबाबतीत कायदेशीर स्थिती, निवडणुकीच्या संदर्भात छेडछाड न करण्याबाबतचे मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय तसेच या विषयाशी संबंधित सर्व कागदपत्रे मा.कुलपतींच्या समोर मांडण्याची संधी देण्यात यावी व अशी संधी दिल्याशिवाय याबाबतीत अंतिम निर्णय करू नये हेही मा.कुलपतींच्या लक्षात आणून देण्यात यावे अशी विनंती करण्यात येत आहे. दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी होणाऱ्या व्यवस्थापन मंडळाच्या सदस्य पदासाठी होणाऱ्या निवडणुकीमध्ये उभा असलेला एक उमेदवार या नात्याने मी हे निवेदन आपणास सादर करीत आहे."

**३३.** सिनेट बैठक पुढे ढकलण्यात यावी अशी विनंती करणारी सन २०२३ ची याचिका क्रमांक ८४७ याचिकाकर्त्यांनी दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजी मा.उच्च न्यायालयाच्या परवानगीने मागे घेतली. ती याचिका मागे घेण्यात आलेली आहे असे हस्तक्षेप अर्जदारांनी विद्यापीठाच्या कुलपतींना/राज्यपालांना व विद्यापीठाच्या कुलगुरुंना कळविले होते व त्या दिवशीच्या आदेशपत्राची प्रतसुद्धा सोबत जोडलेली होती. असे असतांना दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ रोजी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी/विद्यापीठाच्या कुलपतींनी सिनेट बैठकीच्या काही तास अगोदर "Chancellor has accorded his approval to the University's proposal to postpone the Special Meeting of the

---

Registered Under Trade Union Act 1926 No. by II-8162 of 1985

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)**

**University Club House, B-Road, Charchgate, Mumbai-400 020**

PRESIDENT
**Prof. Dr. S. P. Lawande**
Sarang, Balajinagar, Mandavgan Road
Shrigonda, Dist. A.Nagar-413701
Email : splawande@gmail.com
Mob.- 09422228174

GENERAL SECRETARY
**Prof. Dr. P. B. Raghuwanshi**
Buty Plot, Near Mahjan Wadi,
Rajapeth, Amravati – 444601
Email : pbraghuwanshi@gmail.com
Mob.- 09422155603

**Ref. No. : MFUCTO/1/23 Date : 19.03.2023**

प्रति,

**मा. एकनाथराव शिंदे मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

**विषय :** शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देणे व मागण्या यथाशीघ्र मान्य न झाल्यास प्रत्यक्ष संपात सहभागी होणेबाबत.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, दिनांक १४ मार्च २०२३ पासून महाराष्ट्र राज्यातील शासकीय व निमशासकीय कर्मचारी हे आपल्या विविध मागण्यांसाठी बेमुदत संपावर गेलेले आहेत.

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या दि. ८ मे २०२२ रोजी पार पडलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेत विषय क्र. ६ नुसार जुन्या पेन्शन योजने संदर्भात महाराष्ट्र राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या १४ मार्च २०२३ च्या बेमुदत संपास पाठिंबा जाहीर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार आमचा शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेच्या या आंदोलनास पाठिंबा आहे. महाराष्ट्र राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेच्या जुन्या पेन्शन या मागणीसाठी एमफुक्टोचा पाठिंबा राहील. एमफुक्टोच्या सर्व घटक संस्थांनी आपआपल्या विभागात महाराष्ट्र राज्य शासकीय व निमशासकीय कर्मचारी संघटनेच्या वतीने होणाऱ्या कृती कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे जाहीर आवाहन आम्ही केलेले आहे.

आपण या सर्व कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांच्या संदर्भात त्वरित निर्णय घेऊन त्यांना न्याय द्यावा अशी आम्ही आपणांस विनंती करीत आहोत. सध्या या आंदोलनास महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने पाठिंबा जाहीर केलेला आहे. आपण जर यथाशीघ्र या संदर्भात निर्णय घेतला नाही; तर **आम्ही महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षक जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत दिनांक २८.०३.२०२३ पासून बेमुदत संपात सहभागी होऊ, याची आपण दखल घ्यावी. सदर संपात सहभागी होण्याकरिता महाराष्ट्रातील सर्व प्राध्यापकांच्या वतीने हीच बेमुदत संपाची नोटीस समजण्यात यावी.**

धन्यवाद.

**डॉ.एस.पी.लवांदे,** *अध्यक्ष* **डॉ.पी.बी.रघुवंशी,** *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS ORGANIZATION (MFUCTO)

Senate to be held on 10th February 2023." असे आदेश अमरावती विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुंना कळविले. मा.राज्यपालांच्या/कुलपतींच्या कार्यालयाचे हे आदेश सोबत **सहपत्र : ५** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**३३.१** दिनांक ६ फेब्रुवारी २०२३ रोजी नागपूर येथे मा.उच्च न्यायालयासमोर सन २०२३ च्या याचिका क्रमांक ८४७ वर सुनावणी सुरू असतांना कुलगुरू त्यात एक प्रतिवादी असल्याने त्यांचे वकील तेथे हजर होते. तेथे बैठक पुढे ढकलण्याचा मुद्दा निकाली निघाला आहे. आता याबाबतीत आपल्या कार्यालयाकडून विद्यापीठाच्या प्रस्तावावर कोणतीही कारवाई अपेक्षित नाही व योग्यही नाही असे कुलगुरुंनी कुलपतींना तातडीने कळविले असते तर ९ फेब्रुवारीचे आदेश निघालेच नसते.

**३४.** दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ रोजी मा.कुलपतींच्या कार्यालयाकडून पत्र आल्यानंतर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी एक परिपत्रक सिनेटच्या सर्व सदस्यांना पाठविले व "मा.कुलपती कार्यालयाच्या प्राप्त मान्यतेनुपंगाने कळविण्यात येते की, शुक्रवार, दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी निवडणूक कामकाजासाठी होणारी अधिसभेची विशेष सभा तूर्तास स्थगित करण्यात येत आहे." असे कळविले. त्यांचे हे पत्र सोबत **सहपत्र : ६** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**३५.** संघटनेचे अध्यक्ष डॉ.प्रवीण रघुवंशी यांनी या पत्रानंतर संघटनेचे अधिवक्ता ॲड.फिरदोस मिर्झा यांच्याशी संपर्क केला व संपूर्ण घटनाक्रम त्यांच्या लक्षात आणून दिला. स्वतंत्रपणे आता नव्याने याचिका मा.न्यायालयासमोर सादर करावी लागेल असे त्यांचे मत पडले. त्यांच्याकडे सर्व संबंधित कागदपत्रे पाठविण्यात आली व त्यांनी रात्री बऱ्याच उशीरापर्यंत याचिका तयार करण्याचे काम पार पाडले. दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी सुनावणी सुरू होण्याच्या वेळी सकाळच्या सत्रात त्यांनी ही याचिका न्यायालयातच सादर केली व न्यायालयाला अशी विनंती केली की, नोंदणी शाखेत या याचिकेची नोंद झालेली नाही तेव्हा न्यायालयातच ही याचिका दाखल करण्याची आपण आम्हाला परवानगी द्यावी. याचे कारण याबाबतीत टोकाची तातडी (Extreme urgency) निर्माण झालेली आहे. अमरावती विद्यापीठाच्या सिनेटची बैठक पुढे ढकलण्यास मा.कुलपतींनी मान्यता दिलेली आहे. वस्तुतः ही बैठक पुढे ढकलण्याविषयीची विनंती करणारी 847 of 2023 ही याचिका मा.न्यायालयासमोर सादर झाली होती व या न्यायालयाने त्याबाबतीत संमती प्रदान केली नाही. याचिकाकर्त्यांनी याचिका मागे घेतली असे नमूद करून ती याचिका या खंडपीठाने निकाली काढली होती. असे असतांना मा.कुलपतींनी मात्र सभा पुढे ढकलण्यास मान्यता दिलेली आहे. ॲड.फिरदोस मिर्झा यांनी केलेली ही विनंती मा.उच्च न्यायालयाने मान्य करतांना "The request is granted. The petition is accepted" असे आदेश त्यावर पारित केले. याचिकेची नोंद करण्यात यावी आणि आज दुपारच्या सत्रामध्ये ती सुनावणीसाठी ठेवण्यात यावी असेही आदेश मा.खंडपीठाने दिले. या याचिकेमध्ये डॉ.रवींद्र मुंद्रे हे प्रथम याचिकाकर्ते (Petitioner) असून विद्यापीठाचे कुलपती हे प्रथम प्रतिवादी (Respondent) आहेत. सन २०२३ ची याचिका क्रमांक १००१ असे या याचिकेचे क्रमांकन झालेले आहे.

**३६.** दुपारच्या सत्रात न्यायालय सुरू झाल्याबरोबर ॲड.फिरदोस मिर्झा यांनी याबाबतीत असलेली तातडी मा.उच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिली व याबाबतीत अंतरिम आदेशाची न्यायालयाकडून अपेक्षा व्यक्त केली. मा.राज्यपालांचे/कुलपतींचे वकील व विद्यापीठाचे वकील यांनी अंतरिम आदेश देण्याला विरोध केला व आपले म्हणणे दाखल करण्यासाठी आम्हाला वेळ देण्यात यावा अशी मा.खंडपीठाकडे मागणी केली. त्यावर मा.न्यायमूर्तींनी "Time can always be granted to the respondents to file their respective replies in the matter and accordingly it is granted." असे आदेश पारीत केले. मात्र खुद्द न्यायमूर्तींनी विद्यापीठाच्या कुलगुरुंना सिनेट बैठक पुढे ढकलण्याबाबत विनंती करण्याचा व कुलपतींना तशी विनंती मान्य करण्याचा अधिकार कायद्याने किंवा नियमाने दिलेला आहे काय? हा यातील खरा प्रश्न आहे, असे मत व्यक्त केले ते पुढीलप्रमाणे :-

"However, the question is whether the Vice Chancellor of Amravati University has the power to send proposal seeking adjournment or postponement of the meeting even before the meeting is held, to the Hon'ble Chancellor and further question is even if such proposal is received whether the Hon'ble Chancellor has the power to consider and decide it."

**३७.** याचिकाकर्त्यांचे वकील ॲड.फिरदोस मिर्झा यांनी कायद्यामध्ये किंवा परिनियमामध्ये कोठेही अशा प्रकारचा अधिकार विद्यापीठाच्या कुलगुरुंना किंवा कुलपतींना दिलेला नाही असे प्रतिपादन केले. त्यावर विद्यापीठाच्या वकिलांनी कुलगुरुंना तारीख निश्चित करण्याचे अधिकार आहेत त्यामध्ये तारीख पुढे ढकलण्याचा अधिकारसुद्धा अंतर्भूत आहे अशाप्रकारचे प्रतिपादन केले. मा.न्यायमूर्तींनी पुन्हा पुन्हा कुलपतींच्या/राज्यपालांच्या वकिलांना किंवा विद्यापीठाच्या वकिलांना तशी तरतूद कोठे आहे ते दाखवा असे विचारले व तशी तरतूद जर नसेल तर हा अधिकार कसा काय वापरण्यात आला अशी विचारणा केली. हे कामकाज शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"Learned AGP as well as learned counsel for the University

## *राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र*

### प्रसिध्दी पत्रक : दि. २०.०३.२०२३

### *सरकारी कर्मचारी- शिक्षकांचा बेमुदत संप २१ मार्च पासून संस्थगित!*

राज्यातील शिक्षक - कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षी प्रभावाने जुनी पेन्शन योजना (OPS) लागू करा व इतर महत्त्वाच्या मागण्यांच्या आग्रहासाठी दि. १४ मार्च २०२३ पासून महाराष्ट्रातील १७ लाख सरकारी कर्मचारी शिक्षक बेमुदत संपावर गेले होते. संप कालावधीत शासनाने हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, परंतु हे आंदोलन सुरु झाल्यापासून चढत्या क्रमाने आंदोलनाची तीव्रता वाढत गेली. महाराष्ट्राच्या ३६ जिल्ह्यातील हे आंदोलन कमालीचे यशस्वी झाल्यामुळे महाराष्ट्र राज्य शासन अस्वस्थ झाले. त्यामुळेच आज दि. २० मार्च २०२३ रोजी मा. मुख्य सचिवांनी समन्वय समितीला चर्चेसाठी पाचारण केले. या बैठकीत जुनी पेन्शन योजना सर्वांना लागू करा या मागणीसाठी जोरदार मागणी केली. त्या संदर्भात कोणतीही तडजोड होणार नाही हे स्पष्ट केले. त्यानंतर मा.मुख्य सचिवांनी निर्णायक चर्चेसाठी मा.मुख्यमंत्र्यांकडे जाण्याची विनंती केली. त्याप्रमाणे दुपारी ठिक ३ वाजता मा. मुख्यमंत्र्यांकडे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मा. मुख्यमंत्र्यांकडे झालेल्या चर्चेत जुन्या पेन्शनचा विषय प्रथम चर्चेस आला. समन्वय समितीची या संदर्भातील भूमिका स्पष्ट करताना जुनी पेन्शन सर्वांना लागू करण्याची कार्यवाही राज्य शासनास करण्यावाचून प्रत्यवाय नाही हे स्पष्ट करण्यात आली. शेवटी मा. मुख्यमंत्र्यांनी मान्य केल्यानुसार खालील तीन महत्वाच्या मागण्या मनोभावे मान्य केल्या आहेत. १. NPS धारक कर्मचारी निधन पावल्यास त्याच्या कुटुंबियांस कुटुंब निवृत्ती व ग्रॅच्युईटी मंजूर करण्यात आली.

२. राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली व जुनी निवृत्ती वेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी समितीचे गठन करुन खात्रीशीर आर्थिक व सामाजिक सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

**३. जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे (OPS) आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याचे धोरण तत्व म्हणून मान्य करणे असे मान्य केले.**

उपरोक्त प्रमाणे मान्यता देऊन राज्यातील नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजने प्रमाणे अनुज्ञेय असलेला लाभ मिळेल असे स्पष्ट केले. थोडक्यात "जुनी पेन्शन योजना" हे नांव बदलून वेगळया शीर्षाखाली जुन्या पेन्शन इतकाच अधिकृत लाभ NPS धारक कर्मचाऱ्यास मिळणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

**इतर १७ मागण्यांपैकी १० मागण्यांबाबत चर्चा करुन कार्यवाहीसाठी संबंधित सचिवांना आदेशित करण्यात आले. उर्वरित मागण्यांबाबत मुख्य सचिव पातळीवर लवकरच चर्चा करण्याचे आदेश देण्यात आले. संप कालावधी नियमित करणे व इतर बाबतीत खालील प्रमाणे आदेश देण्यात आले.**

१. संप कालावधी संबंधित कर्मचाऱ्याच्या खाती असलेली अनुज्ञेय रजा मंजूर करून नियमित करण्यात येईल.

२. ज्या कर्मचाऱ्यांवर नोटीसा बजावणे, कारणे दाखवा नोटीसा बजावणे तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करणे याबाबत झालेल्या शिस्तभंगाविषयी कार्यवाही मागे घेण्यात येतील.

वरील प्रमाणे सकारात्मक चर्चा झाल्यामुळे मा. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विनंतीस मान देऊन दि. १४ मार्च २०२३ पासून सुरु असलेले संप आंदोलन संस्थगित करण्यात आले. संपात सहभागी झालेल्या सर्व बंधु-भगिनींचे मनस्वी आभार!

**विश्वास काटकर,**
निमंत्रक, राज्य सरकारी-निमसरकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती, महाराष्ट्र

could not point out to us any such provision being present there in Uniform Statute 1 of 2017. Then the question would arise as to under which provision of law the proposal for postponement of a Special meeting of the Senate which was scheduled for holding of elections to various authorities of University could have been made by the Vice Chancellor and under which provision of law such proposal could have been approved by the Chancellor."

**३८.** "The Senate shall meet at least twice a year on the date to be fixed by the Chancellor". हे विद्यापीठाच्या कायद्यातील कलम २८ (४) उध्दृत करून मा.न्यायमूर्तींनी पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले. :-

"A bare perusal of the aforesaid provision creates an impression in a prima facie way that power given to the Hon'ble Chancellor to fix the date of the Senate meeting is plenary. **It vests the Hon'ble Chancellor sole privilege of fixing of date of Senate meeting. This provision of law does not specify that this power also includes the power to postpone the meeting and fix it on some other date."**

**३९.** दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर मा.न्यायमूर्तींनी दिनांक ९ फेब्रुवारी २०२३ रोजी कुलपतींनी/राज्यपालांनी काढलेले आदेश आपण स्थगित करीत आहोत असे नमूद केले. ते शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"We are of the view that interim relief deserves to be granted and accordingly, we direct that the impugned approval dated 9.2.2023 granted by the Hon'ble Chancellor is hereby stayed till further order." मा.उच्च न्यायालयाचे दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारच्या सत्रात पारित केलेले आदेशपत्र सोबत **सहपत्र : ७** म्हणून प्रसृत केलेले आहे.

*समान काम समान वेतन, सर्वांना हवी एकच पेन्शन*

## महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना

नो.क्र. ए.डब्लू.वी./३३३२ कार्यालयीन पत्ता : श्री.वितेश खांडेकर, चिचगड रोड, देवरी ता.देवरी जि.गोंदिया - ४४१९०१

Email : missionoldpension2005@gmail.com

**जावक क्र. १५१ दिनांक : २० मार्च २०२३ प्रसिद्धी पत्र**

आज दिनांक २० मार्च २०२३ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री कार्यालय मा.मुख्यमंत्री यांच्यासोबत राज्य सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती महाराष्ट्रचे निमंत्रक श्री.विश्वासराव काटकर व सुकाणू समितीचे अन्य सदस्य यांची बैठक संपन्न झाली व **त्यात मा.मुख्यमंत्री यांनी जुनी पेन्शन योजनेप्रमाणे आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेची हमी देण्याचे धोरण तत्व मान्य केले,** त्याचप्रमाणे संपाच्या कालावधी दरम्यान कोणावरही कोणत्याही प्रकारची कार्यवाही होणार नाही असे आश्वासन दिले. मात्र त्यानंतर पुढे अचानक समन्वय समितीचे निमंत्रक श्री.विश्वास काटकर यांनी संप मागे घेतला असे वृत्तवाहिन्यासमोर जाहीर केले.

**ज्यावेळी संप पुकारला गेला व तत्पूर्वीही जोपर्यंत जुनी पेन्शन योजना लागू होत नाही तोपर्यंत संप मागे घेतला जाणार नाही अशी ग्वाही निमंत्रक श्री.विश्वास काटकर दिली होती मात्र जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा कोणताही निर्णय शासनाने घेतला नसतांना अचानकपणे संपातून माघार घेण्याची निमंत्रकांची भूमिका अनाकलनीय आणि विश्वासघातकी आहे.** सदर संप हा फक्त एकट्या महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचा नव्हता तर राज्य सरकार-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संघटना समन्वय समिती महाराष्ट्र यांचा होता. त्याकारणाने समन्वय समितीने माघार घेतल्यामुळे आपला नाईलाज झाला आहे. आपण आजही आपल्या जुनी पेन्शनच्या भूमिकेवर ठाम असून १९८२-१९८४ ची जुनी पेन्शन योजनेमध्ये आम्ही कोणतीच तडजोड करणार नाहीत, **परंतु आपण समन्वय समितीचे घटक असल्यामुळे आपणास इच्छा नसताना हा निर्णय मान्य करावा लागत आहे.**

यानंतर सदर समन्वय समिती सोबत महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना कोणत्याच आंदोलन किंवा इतर वेळी समन्वय ठेवणार नाही अशी भूमिका आम्ही घेत आहोत. सदर समन्वय समितीने जरी संपातून माघार घेतली असली तरी येणाऱ्या काळात आपल्या विचारा आणि ध्येयाशी समर्पित संघटना यांना सोबत घेऊन आपली जुनी पेन्शन लढाई यशस्वी करण्यासाठी तीव्र आंदोलन करून जुनी पेन्शन मिळविल्याशिवाय राहणार नाही अशी भूमिका जाहीर करीत आहोत.

**श्री.गोविंद उगले, राज्यसचिव : : श्री.वितेश खांडेकर, राज्याध्यक्ष**

**४०.** नियमात कोणतीही तरतूद नसतांना राज्यपालांनी कुलपती या नात्याने काढलेले हे अत्यंत लाजिरवाणेपणाचे आदेशपत्र असून ते राजभवन सोडण्याच्या गडबडीत असतांना व आता त्यांनी राजभवन प्रत्यक्ष सोडलेले असतांना यापेक्षा जास्त काही लिहिणे योग्य नाही. मात्र दैनिक लोकसत्ताने दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजीच्या "राजभवनातील 'राधाक्कां'ना रजा!" या मथळ्याच्या अग्रलेखात पहिल्याच परिच्छेदात नमूद केलेला मजकूर उधृत करणे आवश्यक वाटते. "राज्यपाल कसा नसावा याचा उच्च प्रतीचा नमुना म्हणून भगतसिंग कोश्यारी यांची इतिहासात नोंद व्हावी. या पदाचे कसे अवमूल्यन करावे याचा भगतसिंह कोश्यारी हे इतका आदर्श नमुना की विद्यापीठ अनुदान आयोगास अभ्यासक्रमात याचा समावेश करण्याचा मोह व्हावा." गेले अनेक महिने राज्यपालांनी जी घाण करून ठेवली आहे ती लक्षात घेवूनच लोकसत्तेच्या संपादकांनी उपरोक्त शब्दरचना वापरली आहे. या घाण प्रसाराच्या कार्यक्रमात शेवटचा 'पोवटा' त्यांनी अमरावती विद्यापीठाच्या प्रांगणात टाकला, एवढेच याबाबत म्हणता येईल. ७८ सदस्यांच्या विधानपरिषदेत आपण १२ सदस्य नेमू दिले नाही तरी तेथील कामकाज निर्बाधपणे चालू आहे. ७६ सदस्यांच्या सिनेटमध्ये आपण नेमावयाचे १० सदस्य नेमले नाहीत तर कायद्यातील १४३ व्या कलमाप्रमाणे सिनेटच्या कामकाजाला कोणतीही बाधा येत नाही एवढी साधी गोष्टसुद्धा हा 'पोवटा' टाकतांना त्यांनी लक्षात घेतली नाही.

**४१.** विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की, दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी कुलपतींच्या/राज्यपालांच्या आदेशाला मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतरसुद्धा याबाबतीत पुढे कोणतीही कारवाई झाली नाही. वस्तुतः कुलपतींचे/राज्यपालांचे व विद्यापीठाचे वकील हे न्यायालयात त्या दिवशी हजर होते. पण मा.उच्च न्यायालयाचे आदेश आल्यानंतर सुद्धा विद्यापीठाने त्याबाबतीत कोणतीही कारवाई केली नाही. दिनांक ११, १२ व १३ फेब्रुवारी २०२३ रोजी याबाबतीत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही हे पाहून अमरावती विद्यापीठाच्या सिनेटच्या १० सदस्यांनी मा.राज्यपालांना/कुलपतींना एक निवेदन दिले व या निवेदनामध्ये मा.राज्यपालांच्या/कुलपतींच्या आदेशाला मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे ही गोष्ट त्यांच्या लक्षात आणून दिली. याच निवेदनाद्वारे सभा पुढे ढकलण्याविषयीची विनंती करणारी याचिकासुद्धा मा.उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या विनंतीवरून मागे घेतलेली आहे हेही त्यांना कळविण्यात आले. आता या प्रकरणामध्ये उच्च न्यायालयातील पुढील सुनावणी दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी होणार आहे. तत्पूर्वी आपण पुढे ढकललेली सभा बोलाविण्याची कारवाई पूर्ण करावी अशी विनंतीसुद्धा या निवेदनाद्वारे या १० सदस्यांनी केली. या निवेदनाची प्रत मा.राज्यपालांचे सचिव, अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू व रजिस्ट्रार यांना पाठविण्यात आली. या निवेदनासोबत दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजीचे मा.उच्च न्यायालयाचे आदेशपत्रसुद्धा जोडण्यात आलेले आहे. दिनांक १४ फेब्रुवारी २०२३ रोजी सिनेटच्या दहा सदस्यांनी मा.राज्यपालांना/कुलपतींना पाठविलेले हे निवेदन सोबत **सहपत्र : ८** म्हणून प्रसृत केलेले आहे.

**४२.** दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी मा. उच्च न्यायालयाने कुलपतींच्या आदेशाला स्थगिती दिली व निवडणुकीच्या संदर्भात आमच्या घटनेने स्वीकारलेल्या तत्त्वज्ञानाच्या विरोधात ही कृती असल्याचा प्रश्न या संदर्भात निर्माण झालेला आहे असे ताशेरे ओढले. पण त्यानंतरसुद्धा आमच्या प्रभारी कुलगुरुंच्या वर्तनात काहीही फरक पडला नाही. निवडणुकीची घोषणा झाल्याच्या तारखेपासून तर निकाल जाहीर होण्याच्या तारखेपर्यंत निवडणूक प्रक्रियेला कुणी कोणताही अडथळा आणायचा नसतो हा सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेला दंडक प्रभारी कुलगुरुंना ठाऊक नसेल तर एखादे वेळी ते क्षम्य मानता येईल, मात्र मा.उच्च न्यायालयाने ती बाब लक्षात आणून दिल्यानंतरसुद्धा आपल्या विद्यापीठात LLM चा अभ्यासक्रम संचालित करणारा विधी विभाग आहे, तो उच्चशिक्षित शिक्षकांनी समृद्ध आहे, त्याशिवाय कायदेशीर सल्ला देण्यासाठी प्रशासन विभागात विधी सल्लागार कक्ष आहे. त्या कुणाचाही सल्ला न घेता प्रभारी कुलगुरुंनी आपले तेच वर्तन चालू ठेवले हे त्या पदाला कलंकित करणारे अक्षम्य वर्तन होय.

**४३.** त्यानंतर पुन्हा दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजी हे प्रकरण मा.खंडपीठासमोर सुनावणीला आले. खरे म्हणजे १० तारखेच्या आदेशानंतर निवडणुकीच्या संचालनाबाबत निश्चित भूमिका घेऊन विद्यापीठाने खंडपीठासमोर येणे आवश्यक होते, पण तसे झाले नाही. अगोदरच्या दिवशी म्हणजे १५ तारखेला पुन्हा नवीन तारीख मागण्यासाठी विद्यापीठाने कुलपती कार्यालयाकडे पत्र पाठविले आहे अशी भूमिका विद्यापीठाने न्यायालयासमोर १६ तारखेला मांडली. या सबंध प्रकरणामध्ये विद्यापीठाच्या निवडणुकीचा कार्यक्रम पार पाडण्याबाबत चालढकल करण्याच्या विद्यापीठाच्या भूमिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक २ मार्च २०२३ रोजी शेवटचा हातोडा हाणला. दरम्यानच्या काळामध्ये राज्यपालांनी त्यांचे सभासद सिनेटवर नेमले होते व या नेमलेल्या सभासदांनी उच्च न्यायालयासमोर आपले म्हणणे मांडणारा अर्ज सादर केला होता. पण न्यायालयाने त्या अर्जाबाबत अनुकूलता दाखविली नाही. संघटनेचे अधिवक्ता ॲड.फिरदोस मिर्झा यांनी

मा.खंडपीठासमोर "दहा सदस्य आता राज्यपालांनी नेमलेले आहेत आणि दोन सदस्य मा.कुलगुरुंनी नेमलेले आहेत, आतातरी निदान सिनेटची बैठक व निवडणुकीचा कार्यक्रम पार पाडला जावा" ही भूमिका दिनांक २ मार्च रोजीच्या सुनावणीत ठामपणे मांडली.

**४३.१** सिनेटची पूर्वनियोजित अंदाजपत्रकीय बैठक ही दिनांक १४ मार्च २०२३ रोजी होणार आहे आणि त्या बैठकीमध्ये विषय क्रमांक ३ पासून पुढचे विषय कामकाज पत्रिकेमध्ये घेण्यात आलेले आहेत. निवडणुकीचा विषय क्रमांक १ आणि २ हा अधांतरिच लटकलेला आहे तेव्हा तो कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट करण्यात यावा अशी बाजू याचिकाकर्त्यांचे वकील ॲड.फिरदोस मिर्झा यांनी मा.खंडपीठासमोर मांडली. त्या दिवशीच्या मा.न्यायालयाच्या आदेशपत्रांत ही बाब नोंदविली गेली. ती पुढील शब्दात :-

"The notice of the elections was already issued by the Registrar of the University on 20-1-2023. As per this notice, the meeting of the Senate was to be held on 10-2-2023 for holding the elections only. Now we are informed by the learned counsel for the petitioners that another meeting of the Senate is scheduled to be held on 14-3-2023, and as per the agenda of this meeting, the list of the subjects begins with Subject No.3 and the agenda is silent about subject Nos.1 and 2. This agenda is taken on record and marked Document 'C' for the purpose of identification. This document does not make any reference to the subjects of elections."

**४४.** याबाबतीत मा.खंडपीठाने दिनांक २ मार्च २०२३ रोजी तपशीलवार सुनावणीनंतर पुढीलप्रमाणे आदेश पारित केले :-

**"6.** We, therefore, direct that the subjects of elections be added to the agenda vide Document 'C' as Subject Nos.1 and 2 and accordingly elections to various posts of the authorities of the University be held in accordance with the rules in the meeting of the Senate scheduled to be held on 14-3-2023 at about 12 noon." हे आदेश सोबत **सहपत्र : ९** म्हणून प्रसृत केलेले आहेत. शेवटी मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाप्रमाणे अमरावती विद्यापीठात निवडणुका पार पडल्या.

**४५.** कायदा व नियम यांचे पालन न करता आपल्या पदाचा गैरवापर करण्याचा जो प्रकार प्रभारी कुलगुरू या नात्याने डॉ.प्रमोद येवले यांच्या हातून आज अमरावती विद्यापीठामध्ये घडला तसाच प्रकार सन २०१७ मध्ये नागपूर विद्यापीठामध्ये प्र-कुलगुरू या नात्याने काम करतांना त्यांच्या हातून घडला होता व त्याबद्दल त्यांना मा.उच्च न्यायालयाने प्रताडित केले होते. त्याबाबतचे सारे तपशील नमूद करणे मला आवश्यक वाटते.

**४६.** वर्धा येथील स्वावलंबी शिक्षण महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य पदाला मान्यता देण्याविषयीचे हे प्रकरण आहे. या महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीची दुसरीकडे प्रभारी कुलगुरू म्हणून नेमणूक झाल्यामुळे ते पद रिक्त झाले. रिक्त झालेल्या पदावर महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने डॉ.दीपक पुनसे यांना प्रभारी प्राचार्य म्हणून दिनांक ४ जुलै २०१७ रोजी नेमणूक दिली. त्यांच्या नेमणुकीला विद्यापीठाने मान्यता द्यावी म्हणून महाविद्यालयाने दिनांक ७ जुलै २०१७ रोजी विद्यापीठाकडे प्रस्ताव पाठविला. सन २०१६ च्या विद्यापीठ कायद्याप्रमाणे शिक्षक आणि प्राचार्य यांना मान्यता देण्याचा अधिकार हा विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुंना देण्यात आला आहे. याबाबतचे सन २०१६ च्या विद्यापीठ कायद्यातील कलम 13 (f) पुढीलप्रमाणे :-

"(13) The Pro-Vice-Chancellor shall,—

(f) accord approval to the appointments of principals and teachers of affiliated colleges and institutions, autonomous colleges and institutions, empowered autonomous colleges, cluster of institutions and recognized institutions or withdraw the same in accordance with the procedure as prescribed in the Ordinances;

**४७.** विद्यापीठाकडे हा प्रस्ताव गेल्यानंतर डॉ.दीपक पुनसे यांना प्रभारी प्राचार्य म्हणून ताबडतोब मान्यता यायला हवी होती, पण तशी ती आली नाही. त्या महाविद्यालयातील ग्रंथपाल हे शिक्षक संवर्गात सर्वात ज्येष्ठ असले तरी कायद्याने ठरवून दिलेली प्राचार्य पदासाठीची पात्रता त्यांच्या जवळ नव्हती. त्यामुळे डॉ.दीपक पुनसे हेच प्राचार्य पदासाठी पात्रता धारण करणारे ज्येष्ठतम शिक्षक होते व त्यामुळे त्यांना मान्यता मिळणे आवश्यक होते. याबाबत पात्रतेच्या अटी काय होत्या? हे सुद्धा समजून घेणे आवश्यक आहे. सन २०१० च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सने ही पात्रता परिच्छेद ४.४.७ अन्वये पुढीलप्रमाणे ठरवून दिली होती. :-

"A. QUALIFICATIONS FOR B. Ed. COURSE:

**(i)** PRINCIPAL / HEAD (in multi-faculty institution): **(a)** Academic and professional qualification will be as prescribed for the post of lecturer; **(b)** Ph.D. in Education; and **(c)** Ten years teaching experience out of which at least five years teaching experience in a Secondary Teacher Educational Institution."

**४८.** महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागाने दिनांक १५ मार्च २०१२ रोजी एक शासननिर्णय प्रसृत केला व त्यामध्ये ही पात्रता पुढील शब्दात नमूद करण्यात आली होती. :- "(१) महाविद्यालयामध्ये जे प्राचार्य पदासाठी अर्हताधारक अध्यापक असतील तर त्यांनाच प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात यावा." नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुंनी याबाबतीत कायद्याने त्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक ३ मे २०१२ रोजी विद्यापीठ कायद्याच्या कलम १४ (८) अन्वये याबाबतीत निदेश निर्गमित केले. त्या निदेशातील परिच्छेद ४ पुढीलप्रमाणे आहे. :-

"4. The minimum qualifications for appointment of teachers & other academic staff in University and Colleges and measures for the maintenance of Standard in Higher Education shall be as provided under University Grants Commission Regulation 2010, Government Resolution No. संकीर्ण-२०११/(२५/११)/विशि-१, dated 15th February, 2011."

**४९.** विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स, महाराष्ट्र शासनाचा शासननिर्णय व नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुंचे निदेश लक्षात घेता डॉ.दीपक पुनसे हेच प्रभारी प्राचार्य पदासाठी पात्र असलेले सर्वात ज्येष्ठतम शिक्षक होते. ग्रंथपाल असलेले गृहस्थ हे त्यांच्यापेक्षा काही महिन्यांनी ज्येष्ठ असले तरी प्राचार्य पदासाठीची पात्रता ते धारण करीत नव्हते. असे असतांना प्र-कुलगुरू डॉ.प्रमोद येवले यांनी डॉ.दीपक पुनसे यांच्या नेमणुकीला मान्यता दिली नाही.

**५०.** डॉ.दीपक पुनसे यांना प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यता न देता दिनांक २८ जुलै २०१७ रोजी या पदासाठी पात्र नसलेल्या ग्रंथपालांना प्र-कुलगुरुंनी मान्यता प्रदान केली असल्याचे पुढील शब्दात महाविद्यालयास कळविले.:-

"उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, शासन निर्णय १५ मार्च २०१२ मधील तरतुदी नुसार महाविद्यालयातील डॉ.उमाजी

## *गोंदियात संप सुरूच*

**गोंदिया :** मुंबईतील बैठकीत जो निर्णय घेण्यात आला तो आम्हाला मान्य नाही म्हणून राज्य स्तरावरील नेतृत्वाने कोणतीही भूमिका घेतली असली तरी जुनी पेन्शन जशीच्या तशी मिळाल्याशिवाय संप मागे घेणार नाही, अशी भूमिका घेत गोंदियातील संघटनेने मंगळवारीदेखील संप सुरूच ठेवला. जोपर्यंत आम्हाला जुनी पेन्शन मिळत नाही तोपर्यंत आम्ही संप संपवणार नाही, असे राज्य सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी समन्वय समितीचे समन्वयक लीलाधर पाथोडे व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना महाराष्ट्रचे सहसचिव आशीष रामटेके यांनी 'लोकसत्ता'शी बोलताना सांगितले.

## *संप सुरू नसल्याचा दावा*

**वर्धा :** सर्व संभ्रम दूर झाले आहेत. सुकाणू समितीतर्फे रात्री दहा वाजता पत्रक निघाले. त्यात सर्व बाजू स्पष्ट करण्यात आल्या आहेत. काही कारणास्तव जुनी पेन्शन हा शब्द टाळला. आज कुठेच संप सुरू नाही. संघटना नेत्यांच्या व्हॉट्सॲप समूहांवर शंका निरसन झाल्यानंतर संपाचा शब्दही उमटला नाही, असा दावा ज्येष्ठ कर्मचारी नेते हरिश्चंद्र लोखंडे यांनी मंगळवारी केला. फसवणूक झाली, असे म्हणण्याचा प्रकार व्यर्थ असल्याचेही ते म्हणाले. **सतरापैकी दहा मागण्या मान्य झाल्या असून उर्वरित सात मागण्यांवर लवकरच चर्चा होणार असल्याचा आदेश आहे,** असेही निदर्शनास आणण्यात येते.

*दिनांक २२ मार्च २०२३ रोजीच्या दैनिक 'लोकसत्ता'च्या नागपूर आवृत्तीमध्ये पृष्ठ ९ वर प्रकाशित झालेली दोन वृत्ते शब्दशः वर दिलेली आहेत.*

पांडुरंग नाल्हे ग्रंथपाल, ते महाविद्यालयात सेवाज्येष्ठ असल्याने सत्र २०१७-१८ करिता कार्यकारी प्राचार्य म्हणून मा. प्र-कुलगुरुंनी मान्यता प्रदान केली आहे."

आपण हे काम संपूर्णपणे बेकायदेशीरपणे करीत आहोत यांची प्र-कुलगुरुंना जाणीव होती आणि त्यामुळे त्यांनी त्यांना फक्त विद्यार्थ्यांचे नामांकन अर्ज, परीक्षा अर्ज, टिसी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देयकावर स्वाक्षरी करण्याकरिता फक्त ही मान्यता प्रदान करण्यात आली आहे असे त्या आदेशात लिहिले होते. महाविद्यालयाने व स्वतः डॉ.दीपक पुनसे यांनी वारंवार स्मरणपत्रे देऊनसुद्धा प्रभारी कुलगुरुंनी आपल्या भूमिकेमध्ये सुधारणा केली नाही व त्यामुळे हे प्रकरण उच्च न्यायालयात गेले.

**५१.** प्रभारी कुलगुरुंनी पारित केलेल्या आदेशाच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर डॉ.दीपक पुनसे यांनी जी याचिका दाखल केली ती सन २०१७ ची याचिका क्रमांक ५३४८ होय. डॉ.दीपक बापूरावजी पुनसे हे या याचिकेमध्ये एकमेव वादी (Petitioner) होते व पुढील पाच प्रतिवादी (Respondents) होते. **(1)** Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur through its Registrar, Civil Lines, Nagpur **(2)** The Joint Director of Higher Education, State of Maharashtra, Nagpur Division, Nagpur **(3)** Swawalambi Shikshan Prasarak Mandal, Wardha through its Secretary Shri Narayan Shhridhar Bhide, aged 52 yrs., Office at Dhantoli, Wardha, Dist. Wardha **(4)** Shri Abhay Narmadaprasad Kewaliya, aged about 52 yrs., c/o Aditi Medicals, Shivaji Chowk, Wardha **(5)** Dr. Umaji Pandurang Nalhe, aged about 58 yrs., Occu - Service, r/o Tuljai, Opp. Ganesh Vyas Mandir, Deorankar Layout, Sindi-Meghe, Wardha.

**५२.** या याचिकेमध्ये नागपूर विद्यापीठाच्या प्र-कुलगुरुंनी पारित केलेले दिनांक २८ जुलै २०१७ रोजीचे आदेश रद्दबातल करण्यात यावे अशी मुख्य विनंती होती ती पुढील शब्दात :-

(i) by a writ of mandamus or by a suitable writ, order or direction the letter dated 28.07.2017 (Annexure G) issued by respondent No. 1, Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur granting authority in favour of respondent No. 5 to act as an officiating Principal of Swavalambi college of Education, Wardha may kindly be quashed and set aside.

**५३.** सदरहू याचिकेमध्ये सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दिनांक ४ डिसेंबर २०१७ रोजी मा.उच्च न्यायालयाने या याचिकेमध्ये निर्णय दिला. प्रभारी प्राचार्य म्हणून कोणाला मान्यता देण्यात यावी? याबाबत पात्रतेच्या अटी काय आहेत? हे मा.उच्च न्यायालयाने आपल्या आदेशाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढील शब्दात नमूद केलेले आहे. :-

"Qualifications for the post of Principal of an educational college are stipulated by U.G.C. Regulations dated 30.6.2010 which mandates Ph.D. in Education, i.e. a qualification after M.Ed. Nagpur University has thereafter issued a Direction No.4 of 2012 and accepted it. Even State Government through its Department of Higher & Technical Education has on 15.3.2012 laid down that while appointing anybody as an officiating Principal, available duly qualified Lecturer should only be given that charge."

**५४.** ग्रंथपाल हे जेष्ठतम शिक्षक असले तरी प्राचार्य पदासाठीची ते पात्रता धारण करीत नसल्यामुळे त्यांना कार्यकारी प्राचार्य म्हणून मान्यता देता येणार नाही असे स्पष्ट शब्दात आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये मा.न्यायालयाने नमूद केले होते ते पुढील शब्दात :-

"Similarly, educational qualifications of respondent no.5 are not in doubt. However, as a Librarian he has put in more service and as he is treated as teacher, he is senior to petitioner but then as is apparent from above-mentioned U.G.C. Regulations adopted by University or mandate of State Government, as he is not holding Ph.D. in Education, he cannot be made additional Principal."

**५५.** प्र-कुलगुरुंच्या वतीने विद्यापीठाने जे काही शपथपत्र दाखल केले ते पाहता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सकडे ते दुर्लक्ष करीत आहेत आणि त्यामुळे We, therefore, find absence of bonafides in the defence of University असे ताशेरे मा.न्यायमूर्तींनी आपल्या निर्णयात ओढले होते. विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स व राज्यशासनाचा शासननिर्णय लक्षात घेता याचिकाकर्त्यांना प्रभारी प्राचार्य म्हणून प्रभार देणे आवश्यक होते असे म्हणून प्र-कुलगुरुंनी पारित केलेले ग्रंथपालांना प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यता देणारे आदेश आपण रद्दबातल करीत आहोत व याचिकाकर्त्यांना मान्यता देण्यात यावी असेही आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले. ते पुढील शब्दात :-

"(8) It is apparent that in terms of UGC Regulations and the mandate of State Government as contained in G.R. dated 15.3.2012, petitioner needs to be given charge as officiating additional Principal of the college run by respondent no.3.

(9) Accordingly, we set aside approval given to respondent no.5 by respondent no.1 and direct it to grant the same to petitioner."

**५६.** या संपूर्ण प्रकरणामध्ये प्र-कुलगुरू या नात्याने डॉ.प्रमोद येवले यांचे वर्तन हे अत्यंत आक्षेपार्ह होते ही गोष्ट मा.उच्च न्यायालयाच्या लक्षात आली होती. डॉ.प्रमोद येवले यांनी ग्रंथपाल यांना प्रभारी प्राचार्य म्हणून मान्यता देण्याचे आदेश पारित करतांना विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स, राज्यशासनाचा शासननिर्णय व खुद्द विद्यापीठाचे निदेश याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले होते. कुलगुरू असतील, प्रभारी कुलगुरू किंवा प्र-कुलगुरू असतील त्यांनी त्यांचे अधिकार वापरतांना कायदे व नियम यांचे पालन करणे आवश्यक असते. डॉ.प्रमोद येवले यांची वर्तणूक ही त्याबाबतीत विपरित असल्यामुळे प्र-कुलगुरुंना आम्ही असा इशारा देत आहोत की, अशा प्रकारचा दृष्टिकोन त्यांनी भविष्यात ठेवता कामा नये. तसे लक्षात आल्यास त्यांना ताकीद देण्याचे आदेश, इतकेच नव्हे तर वेळ पडल्यास प्र-कुलगुरू म्हणून काम करण्यास प्रतिबंध करणारे आदेशसुद्धा या न्यायालयातून पारित केल्या जातील, अशा शब्दात प्र-कुलगुरू यांच्यावर मा.खंडपीठाने ताशेरे ओढले होते. ते पुढील शब्दात :-

"(10) We also caution Pro-Vice-Chancellor of University and warn that in future if such approach is noticed, appropriate restraining orders, including orders restraining him from functioning as Pro-Vice-Chancellor shall be passed by this Court."

या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिनांक ४ डिसेंबर २०१७ रोजी पारित केलेले आदेश **सहपत्र : १०** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

**५७.** डॉ.प्रमोद येवले यांनी ज्याप्रकारे प्र-कुलगुरू या नात्याने असलेले अधिकार वापरले त्याबद्दल त्यांची उच्च न्यायालयाने चांगलीच निर्भर्त्सना केली होती. हा निकाल हाती आल्यावर डॉ.प्रमोद येवले यांना आपल्या भविष्यावर याचे काय परिणाम होतील हे लक्षात आले व त्यांनी हे ताशेरे व्यपगत करावे म्हणून उच्च न्यायालयासमोर अर्ज दाखल केला. (Civil Application (W) No.116 of 2018 In Writ Petition No.5348 of 2017 (D)) या अर्जामध्ये डॉ.प्रमोद येवले यांनी उच्च न्यायालयाकडे गयावया करून आपल्यावरचे ताशेरे काढून टाकण्यात यावेत अशा प्रकारची विनंती केली. त्याबाबतीत सुनावणीनंतर मा.खंडपीठाने परिच्छेद १० मधील ताशेरे काढून टाकण्याची त्यांनी विनंती मान्य केली, मात्र असे करतांना अशी चूक जर पुन्हा झाल्याचे या न्यायालयाच्या लक्षात आले तर काढून टाकलेले हे ताशेरे पुन्हा त्यांच्या संपूर्ण शक्तीसह पुनर्जीवित करण्यात येतील असेही आपल्या आदेशात नमूद केले ते पुढील शब्दात :-

"(2) We expunge all remarks of this Court in order dated 04-12-2017. If such an error is again brought to the notice of this Court, the remarks sought to be expunged shall revive and carry its weight."

या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९ जानेवारी २०१८ रोजी पारित केलेले आदेश **सहपत्र : ११** म्हणून सोबत प्रसृत केलेले आहे.

**५८.** विद्यापीठाच्या सिनेटची बैठक बोलाविणे व कामकाज पार पाडणे ही जबाबदारी मुख्यत्वे कुलगुरुंची असते. तत्कालीन कुलगुरुंनी / प्रभारी कुलगुरुंनी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करून सिनेटच्या निवडणुकीसाठीच्या विशेष सभेचे १० फेब्रुवारी २०२३ रोजी आयोजन केले होते. नव्याने आलेले प्रभारी कुलगुरू डॉ.प्रमोद येवले यांनी प्रभार स्वीकारल्या नंतरच्या काही तासातच कायदेशीररीत्या बोलाविण्यात आलेली सभा उद्ध्वस्त करण्याचा सर्व शक्तीनिशी

बेकायदेशीरपणे प्रयत्न केला. कायद्यामध्ये अशा प्रकारचे कोणतेही अधिकार नसतांना त्यांनी दिनांक ४ फेब्रुवारी २०२३ रोजी सभा पुढे ढकलण्याबाबतचे पत्र मा.कुलपतींना पाठविले आणि निवडणुकीसाठीची ही सभा होणार नाही असा प्रयत्न शेवटपर्यंत केला व त्यात यशही मिळविले. न्यायालयाने दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी भारतीय संविधानाने स्वीकारलेल्या निवडणुकीच्या तत्त्वज्ञानाच्या विरोधात ही तुमची कृती आहे याची आठवण करून दिल्यानंतरसुद्धा त्यांच्या वर्तनात कोणताही फरक पडला नाही. दिनांक १४ मार्च २०२३ रोजी सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता होऊन सिनेटची अंदाजपत्रकीय बैठक पूर्वीच्या कुलगुरुंनी बोलाविली होती. त्यामध्ये विषय क्रमांक ३ पासून विषय ठेवण्यात आलेले होते. क्रमांक १ व २ वर असलेले निवडणुकीचे विषय अधांतरी टांगलेले होते. ते त्या बैठकीसमोर ठेवावे असे सुद्धा प्रभारी कुलगुरुंना वाटले नाही. शेवटी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिनांक १४ मार्च २०२३ रोजीच्या बैठकीत क्रमांक १ व २ चे विषय हे सिनेटच्या बैठकीसमोर त्यांना ठेवावे लागले. या एकूणच प्रकरणामध्ये कायद्याने व नियमाने जे अधिकार दिलेले नाहीत ते अधिकार वापरून निवडणुकीसाठीची सभा उद्‌ध्वस्त करण्यासाठी त्यांनी जो उघड उघड प्रयत्न केला तो अत्यंत लज्जास्पद व कुलगुरू पदाला कलंकित करणारा होता.

*****

## NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

विद्यापीठात कुलगुरू, प्रभारी कुलगुरू अथवा प्र-कुलगुरू या पदावरून काम करीत असतांना कायदे व नियम बाजूला ठेवून, करायला नको ते करणे व करायला पाहिजे ते न करण्यातून बेकायदेशीर वर्तन करणे हा डॉ.प्रमोद येवले यांचा अत्यंत आक्षेपार्ह असा एक वर्तणुकीचा भाग झालेला आहे, ही गोष्ट मा.उच्च न्यायालयासमोर सिद्ध झालेली आहे. दिनांक ४ डिसेंबर २०१७ रोजी सन २०१७ च्या याचिका क्रमांक ७३४८ मध्ये मा.नागपूर खंडपीठाने याबाबत पुढीलप्रमाणे आदेश पारित केले होते. :-

(10) We also caution Pro-Vice-Chancellor of University and warn that in future if such approach is noticed, appropriate restraining orders, including orders restraining him from functioning as Pro-Vice-Chancellor shall be passed by this Court.

**२.** मा.उच्च न्यायालयाने उपरोक्त आदेश पारित केल्यानंतर डॉ.प्रमोद येवले यांनी मा.उच्च न्यायालयासमोर उपरोक्त ताशेरे विलोपित करावे म्हणून जो 'दयेचा अर्ज' केला तो लक्षात घेऊन मा.उच्च न्यायालयाने दिनांक १९ जानेवारी २०१८ रोजी जे आदेश पारित केले त्यात पुढीलप्रमाणे नमूद आहे. :-

"(2) We expunge all remarks of this Court in order dated 04-12-2017. **If such an error is again brought to the notice of this Court, the remarks sought to be expunged shall revive and carry its weight."**

**३.** मा.उच्च न्यायालयाने मूळ ताशेरे विलोपित करतांना दिलेला इशारा डॉ.प्रमोद येवले यांनी लक्षात घेतला नाही व त्याप्रमाणे आपल्या वर्तनात सुधारणा केली नाही, असे स्पष्टपणे दिसून येते. अमरावती विद्यापीठामध्ये प्रभारी कुलगुरू या नात्याने कार्य करीत असतांना निवडणुकीसाठीची सिनेटची सभा उद्‌ध्वस्त करण्याचा त्यांनी जो प्रयत्न केला तो निवडणुकीविषयीच्या मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या दंडकाच्या पूर्णपणे विरोधात होता. उच्च न्यायालयाच्या मा.न्यायमूर्ती श्री.सुनील शुक्रे व मा.न्यायमूर्ती श्रीमती वृषाली जोशी यांच्या खंडपीठाने ही गोष्ट वारंवार लक्षात आणून दिल्यानंतरसुद्धा त्यांनी आपले वर्तन दुरुस्त केले नाही व शेवटी निवडणुकीचा हा कार्यक्रम उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पार पडला. ते स्वतः दुरुस्त झालेच नाहीत. हे त्यांचे वर्तन लक्षात घेता :-

**(i)** यापुढे डॉ.प्रमोद येवले यांना कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही पदावर काम करण्यापासून मनाई करण्यात यावी असे आदेश पारित करण्यासाठी विनंती करणारी याचिका मा.उच्च न्यायालयासमोर सादर करण्याचा निर्णय संघटनेच्या पातळीवर घेण्यात आलेला आहे.

**(ii)** डॉ.प्रमोद येवले यांनी प्रभारी कुलगुरू या नात्याने लेखी स्वरूपात आपल्या वरिष्ठांना म्हणजे मा. कुलपतींना असत्य माहिती कळविली व सत्य माहिती मा.न्यायालयापासून दडवून ठेवली. सिनेटची पुनर्रचना पूर्ण झालेली आहे असे नोटिफिकेशन विद्यापीठाच्या गॅझेटमध्ये दिनांक २१ जानेवारी २०२३ रोजी प्रकाशित झाले असतांना फेब्रुवारी महिन्यात "सिनेटची रचना अजून पूर्ण झालेली नाही" असे वरिष्ठांना कळविले व ती बाब न्यायालयापासून दडवून ठेवली ही बाब आता सिनेटच्या बैठकीत उघड झाली. मा.कुलपतींना अनेक बाबतीत असत्य माहिती कळवून बेकायदेशीर कृत्त्य करण्यासाठी विनंती करण्याच्या त्यांच्या या कलंकित वर्तनाची चौकशी करून त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्याचा निर्णय संघटनेच्या पातळीवर घेण्यात आलेला आहे.

**डॉ. प्रवीण रघुवंशी**, *अध्यक्ष*

**डॉ. विवेक देशमुख**, *उपाध्यक्ष* **डॉ. नितीन चांगोले**, *सहसचिव*

NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/078/2021-23 (Uploaded on www.nuta.in on 30.03.2023) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.04.2023**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................